दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -११९ | शनिवार दि.०३ जानेवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-119 | Saturday, Dt.03 January 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4



बीड – बीडचे नूतन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी.

# महाराष्ट्रात फक्त मराठी सक्तीची

## ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांची ग्वाही

स्वराज्यविस्तारक छत्रपती शाहू महाराज साहित्यनगरी (सातारा) : विनायक कुलकर्णी

महाराष्ट्रामध्ये फक्त आणि फक्त मराठीच सक्तीची आहे अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट निर्वाळा दिला आणि उपस्थित सर्व मराठीजनांची मने त्यांनी जिंकली.

९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. व्यासपीठावर संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, सार्वजनिक बांधकाममंत्री आणि स्वागताध्यक्ष श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले, साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या लेखिका डॉ. मृदुला गर्ग, मावळत्या संमेलनाध्यक्ष डॉ.तारा भवाळकर,ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे,ज्येष्ठ उद्योजक फरोक कुपर,साहित्य महामंडळाचे प्रमुख विश्वस्त प्रा.डॉ.शिवाजीराव कदम,अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी,उपाध्यक्ष गुरैय्या स्वामी,कार्यवाह सुनिताराजे पवार,संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, कोषाध्यक्ष नंदकुमार सावंत तसेच महामंडळाचे पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळयामध्ये मनोगत व्यक्त करताना महामंडळाचे अध्यक्ष या नात्याने प्रा. मिलिंद जोशी यांनी माय मराठीची अवहेलना होत असताना अन्य भाषांचे कोडकौतुक नको,भाषेला विरोध नाही परंतु सक्तीला विरोध आहे,अशी भूमिका मांडली होती.त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व मुद्दयांचा परामर्श घेताना महाराष्ट्रात सक्ती फक्त मराठीचीच राहिल असे स्पष्ट केले,मराठी भाषा वगळता अन्य कुठल्याही भाषेची सक्ती नाही. त्रिभाषा सूत्रानुसार आणखी कोणती भाषा समाविष्ट करावी याविषयी विचार सुरू आहे.

कोणत्या वर्गापासून भाषा शिकवायची याचा विचार करण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली असून या समितीचा अहवाल अंतिम टप्प्यामध्ये आलेला आहे.मराठी भाषा ही अभिजात होतीच तिला राजमान्यता देण्याचे काम केंद्रातील मोदी सरकारने केले आहे.त्याचा



उपयोग करून आता या भाषेला संपूर्ण भारतात लोकमान्यता मिळवून देण्याचे काम आपल्याला करायचे आहे, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, इंग्रजी, फ्रेंच जर्मन अशा परदेशी भाषांना आपण पायघड्या घालतो;परंतु भारतीय भाषांना मात्र विरोध करतो ही भूमिका योग्य नाही.स्वभाषेचा सन्मान नक्कीच व्हायला हवा. त्याचवेळी इतर भाषांचेही स्वागत व्हायला हवे,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मराठी साहित्याला ख–या अर्थाने समृद्ध केले ते वारकरी संप्रदायाने आणि संतसाहित्याने.मराठी ही मनामनांना जोडणारी भाषा आहे.ही केवळ भक्तीची नाही तर मूल्यांची भाषा आहे.साहित्यिकांचे कार्य समाजाला दिशा देण्याचे आहे. त्यामुळे लोकशाही विचारांची ही अभिव्यक्ती साहित्यविश्वात अबाधित राहणे महत्त्वाचे आहे. साहित्य संमेलन मावळत्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांनी सांगितले की, आजच्या पिढीमध्ये मराठी साहित्य बाबत आवड निर्माण होत आहे. नव नवीन विषयांवर लेखन निर्मिती करण्यात येत आहे. यामुळे मराठी भाषा समृद्ध होण्याची प्रक्रिया गतिमान होत आहे. या नवनिर्माण प्रक्रियेला प्रोत्साहन देण्याची गरज आहे.मराठी भाषेतील लेखन निर्मिती मध्ये मराठीजनाचा मोठा सहभाग आहे.यासाठी यापुढील काळात साहित्य संमेलनास पुढाकार मिळाला पाहिजे तसेच ग्रंथालय चळवळ अधिक व्यापक होण्याची आवश्यकता आहे असे त्यांनी सांगितले.

## बापू शिंदे सर यांना बीड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

आष्टी – ( प्रतिनिधी) पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आष्टा ह. ना. केंद्र मातकुळी, ता. आष्टी येथे कार्यरत असलेले कार्यतत्पर, शांत, संयमी आदर्श सहशिक्षक बापू बाबा शिंदे सर यांना जिल्हा परिषद बीड शिक्षण विभागातर्फे दिला जाणारा सन २०२४ चा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण गुरूवार दि. १ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वा. छत्रपती



संभाजी महाराज क्रीडांगण बीड येथे मा. ना. श्री. अजित आशाताई अनंतराव पवार उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन राज्य उत्पादन शुल्क मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री जिल्हा बीड यांच्या शुभहस्ते व मा. ना. श्री. बाबासाहेब पाटील सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य, मा. खा. श्री. बजरंग मनोहर सोनवणे संसद सदस्य बीड लोकसभा, मा. आ. श्री सतीश चव्हाण, मा. आ. श्री. विक्रम काळे, मा. आ. श्री. प्रकाश दादा सोळंके, मराठवाडा भूषण मा. आ. श्री. सुरेश रामचंद्र धस साहेब, मा. आ. श्री. संदीप क्षीरसागर, मा. आ. श्री.

(उर्वरीत पान २ वर)

## प्रभाग २ मधील मतदारांचे ऋण कधीच विसरणार नाही – बाळराजे पवार

### गणेश नगर येथे नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांचा भव्य नागरी सत्कार सोहळा संपन्न


गेवराई (प्रतिनिधी): गेवराई नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ मधील मतदारांनी आपल्यावर भरभरून विश्वास टाकत दिलेल्या भक्कम पाठिंब्याचे ऋण आपण कधीही विसरणार नाही, असे प्रतिपादन भाजपचे नेते बाळराजे पवार यांनी केले. प्रभाग २ मधील गणेशनगर येथील दत्त मंदिर परिसरात आयोजित नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताभाभी बाळराजे पवार व सर्व



नगरसेवकांच्या नागरी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताभाभी पवार, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या सुविद्य पत्नी सौ. गिरीकाभाभी पवार,

(उर्वरीत पान २ वर)




शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## देगलूर न.प. गटनेतेपदी उज्वला लक्ष्मीकांत पदमवार यांची निवड



देगलूर /प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांच्या आदेशानुसार आ. प्रतापराव पाटील चिखलीकर व जिल्हा अध्यक्ष रा. काँ. पा. शिवराज पाटील होटाळकर यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड येथे पार पडलेल्या बैठकीत देगलूर नगरपरिषदेच्या

(उर्वरीत पान २ वर)



## संपादकीय....


# एकीचे बळ

महापालिका निवडणुकांच्या निमित्ताने राजकीय क्षेत्रात बरेच काही बरे-वाईट घडत आहे. इतके दिवस जे काही घडले-बिघडले ते सुधारण्याचे प्रयत्न होत आहेत. सर्वच राजकीय पक्षांना एकीच्या बळाची जाणीव होत आहे. आपसातील मतभेद विसरून पुन्हा एकवटण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. ज्यांच्यात आडवा विस्तू जात नव्हता ते एकत्र फुलण्याचे स्वप्न पाहत आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेना ठाकरे आणि मनसेचे मनोमिलन झाले आहे, फक्त त्याची घोषणा बाकी आहे. एकदा का मिलन झाले की त्याचा निकाल येण्यास तसा उशीर होणारच. मराठीच्या मुद्यावरून २० वर्षांनंतर एकाच व्यासपीठावर एकत्र आल्यानंतर गत काही महिन्यांपासून उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांच्या गाठीभेटी वाढल्या होत्या, कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये उपस्थिती वाढली होती. त्यामुळे दोन्ही ठाकरे बंधू लवकरच राजकीयदृष्ट्या एकत्र येणार असल्याचे संकेत मिळाले होते. आता शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनीच युती संदर्भात सूतोवाच केले आहे.

त्यांनी आपल्या पोस्टमध्ये राज व उद्धव ठाकरेंचा पुष्पगुच्छ देतानाचा फोटो शेअर केला आहे आणि त्याच्या खाली 'उद्या १२ वाजता' असे कॅप्शन दिले आहे. मनसे आणि ठाकरेंची शिवसेना यांच्यात जागावाटप पूर्ण झाल्याचे सांगण्यात येत असले तरी काही जागांवरून तिढा कायम होता. याच मुद्यावरून राज ठाकरे यांनी मंगळवारी दोन्ही पक्षांच्या नेत्यांना जागा वाटपाची प्रक्रिया अनावश्यक ताणून धरू नका, लांबवू नका असे सांगितले होते. 'मातोश्री'वर मंगळवारी मनसे आणि ठाकरे गटाच्या नेत्यांच्या उपस्थितीत महत्त्वाची बैठक पार पडली होती. त्यावेळी शिवडी आणि दादरमधील जागावाटपाचा तिढा पार पडला होता. परंतु भांडुप, विक्रोळी आणि पश्चिम उपनगरातील काही जागांवरून दोन्ही गटांत रस्सीखेच सुरू होती. मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठी मंगळवारपासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ झाल्याने ठाकरे गट व मनसेतील इच्छुक उमेदवारांचे पक्षाकडून मिळणा-या 'एबी' फॉर्मकडे लक्ष लागले आहे. त्यामुळे लवकरात लवकर युतीच्या घोषणेची प्रतीक्षा होती. 'एकत्र आलो ते एकत्र राहण्यासाठी' ही ५ जुलैच्या मोर्चाच्या वेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिलेली घोषणा अखेर प्रत्यक्षात येत आहे. हिंदी सक्तीच्या विरोधात झालेल्या आंदोलनातील यशाबद्दल विजयोत्सवाच्या निमित्ताने वरळीच्या डोममध्ये दोन भाऊ एकत्र आले. त्याच दिवशी युतीची निश्चिती झाली होती.

## शांत, संयमी, कर्तव्यदक्ष व कार्यतत्पर
# आदर्श शिक्षक - श्री. आजिनाथ मिसाळ

शिक्षण म्हणजे केवळ अक्षरओळख नव्हे, तर जीवनाला दिशा देणारी संस्कारांची मशाल आहे. ही मशाल अखंडपणे पेटती ठेवण्यासाठी आयुष्य वेचणारे काही शिक्षक समाजाच्या इतिहासात कायमस्वरूपी स्थान मिळवतात. आष्टी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पांगुळगव्हाण येथील आदर्श शिक्षक श्री. आजिनाथ बाजीराव मिसाळ हे अशाच विरळा शिक्षकांपैकी एक आहेत. त्यांनी आपल्या ३२ वर्षे २ महिने ११ दिवसांच्या प्रदीर्घ सेवाकाळात शिक्षणाला केवळ नोकरी न मानता समाज घडविण्याचे पवित्र व्रत मानले. त्यांनी नियतवयोमानानुसार दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्ती स्वीकारली असली, तरी त्यांच्या कार्याचा ठसा अजून अनेक पिढ्यांच्या आयुष्यावर उमटत राहणार आहे. त्यांच्या या अतुलनीय कार्याचा गौरव करण्यासाठी आज शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथील मोरेश्वर लॉन्स मंगल कार्यालयात भव्यदिव्य सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



या गौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी आष्टी पंचायत समितीचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी श्री. मोहनराव काकडे साहेब यांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आष्टी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. गोकुळ बागलाने साहेब, अहिल्यानगर जिल्हा परिषद उपशिक्षणाधिकारी श्री. सचिन राख साहेब, जेष्ठ शिक्षण विस्ताराधिकारी श्री. मनोरंजन धस साहेब, पाटोदा गटशिक्षणाधिकारी श्री. धनंजय बोंदार्डे साहेब, शिरूर गटशिक्षणाधिकारी श्री. प्रशांत शिंदे साहेब, जेष्ठ शिक्षण विस्ताराधिकारी सौ. सिमा काळे मॅडम, मा. शिक्षणाधिकारी नाशिक श्री. नवनाथराव औताडे साहेब, मा. शिक्षणाधिकारी बीड श्री. विक्रमराव पोकळे साहेब, मा. गटशिक्षणाधिकारी श्री. सुधाकर यादव साहेब यांची उपस्थिती लाभणार आहे.

याशिवाय समाजसेवक श्री. दीपक नागरगोजे, श्री. किरण बांगर, शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष श्री. मारुती पठाडे, उपाध्यक्ष श्री. अशोक लटपटे, सचिव श्री. महेशकुमार शिंदे, आय.टी. इंजिनियर (स्पेन) श्री. अमित सांगळे, सरपंच श्री. बाबासाहेब गिते, सौ. लता गिते, विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेचे संचालक मंडळ, विविध शिक्षक संघटना, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, ग्रामपंचायत पदाधिकारी, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य व समस्त ग्रामस्थ पांगुळगव्हाण यांची लक्षणीय उपस्थिती कार्यक्रमाला लाभणार आहे.

दि. १० डिसेंबर १९६७ रोजी जन्मलेले श्री. आजिनाथ बाजीराव मिसाळ यांची शिक्षणसेवेतील वाटचाल दि. १९ ऑक्टोबर १९९३ रोजी प्रथम नेमणुकीपासून सुरू झाली. सुरुवातीपासूनच त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या समस्या, मर्यादा आणि गरजा जवळून पाहिल्या व त्या लक्षात घेऊन अध्यापनाची पद्धत आत्मसात केली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बिडसांगवी, भाळवणी, कासेवाडी तसेच जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा पांगुळगव्हाण येथे त्यांनी सहशिक्षक म्हणून कार्य करताना शिस्त, गुणवत्ता आणि संस्कार या त्रिसूत्रीवर आधारित शिक्षण दिले. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला वळण देणारा शिक्षक

श्री. मिसाळ सर यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते विद्यार्थ्यांशी मैत्रीपूर्ण पण शिस्तप्रिय नाते ठेवत. प्रत्येक विद्यार्थी शिकू शकतो, फक्त योग्य मार्गदर्शनाची गरज आहे हा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळेच त्यांनी नियमित अभ्यासक्रमाबरोबरच शिष्यवृत्ती परीक्षा, एनएमएमएस परीक्षा यांसाठी स्वतःहून पुढाकार घेत जादा तास घेतले. अनेक गरीब, कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना त्यांनी शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवले. आज विविध क्षेत्रांत यशस्वी झालेले अनेक विद्यार्थी अभिमानाने सांगतात की, मिसाळ सर नसते तर आम्ही शिकलोच नसतो.

त्यांच्या कार्यकाळात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाळवणी व पांगुळगव्हाण या शाळांना आदर्श शाळा पुरस्कार मिळणे हा केवळ योगायोग नव्हता. शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, उपक्रमशीलता, स्वच्छता, शालेय वातावरण, विद्यार्थी सहभाग, पालक संवाद या सर्व बाबींमध्ये त्यांनी सातत्याने सुधारणा घडवून आणली. पुरस्कारांपलीकडचे खरे समाधान स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्था यांच्याकडून मिळालेला आदर्श शिक्षक पुरस्कार हा त्यांच्या कार्याचा अधिकृत गौरव असला, तरी विद्यार्थ्यांचे यश हेच माझे खरे पारितोषिक आहे असे ते नेहमी म्हणत. सेवापूर्ती नव्हे, तर प्रेरणादायी अध्याय सेवापूर्ती म्हणजे सेवेचा अंत नसून, समाजासाठी दिलेल्या योगदानाचा सन्मान असतो. श्री. आजिनाथ बाजीराव मिसाळ यांनी शिक्षणाच्या माध्यमातून घडवलेली मूल्यनिष्ठ पिढी हीच त्यांची खरी ओळख आहे. त्यांचे शांत स्वभाव, संयमी वृत्ती, कर्तव्यनिष्ठा व कार्यतत्परता ही पुढील पिढीतील शिक्षकांसाठी दीपस्तंभासारखी आहे. या सेवापूर्ती गौरव सोहळ्यानिमित्त श्री. आजिनाथ बाजीराव मिसाळ यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य व आनंदी, समाधानी निवृत्त जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा. शिक्षणाच्या या ज्ञानयज्ञात त्यांनी पेटवलेला दीप भविष्यातही अनेक जीवनांना उजाळा देत राहील, यात कोणतीही शंका नाही. पुनश्च एकदा आजच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्याच्या निमित्ताने हार्दिक हार्दिक शुभेच्छा...!!!

**- राजेंद्र लाड (आष्टी)**
मो.९४२३१७०८८५

# निष्ठा, निर्भीडपणा आणि माणुसकीचा त्रिवेणी संगम - विनोद नाना रोडे

राजकारण हा शब्द उच्चारताच अनेकांच्या मनात सत्तासंघर्ष, पदलालसा, स्वार्थ आणि संधीसाधूपणा अशी चित्रे उभी राहतात. मात्र या सगळ्यापलीकडे जाऊन काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, जी राजकारणाकडे सेवेचे माध्यम, समाजऋण फेडण्याची संधी आणि लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्याचे साधन म्हणून पाहतात. शिराळ (ता. आष्टी) येथील विनोद नाना रोडे हे अशाच विचारधारेतून घडलेले, निष्ठेवर उभे राहिलेले नेतृत्व आहे. कोणतेही मोठे पद, गाजावाजा किंवा अधिकाराची मोहोर नसतानाही त्यांनी जनतेच्या मनात जे स्थान मिळवले आहे, ते अनेक सत्ताधीशांनाही मिळत नाही. आष्टी मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार सुरेश धस यांचे अत्यंत विश्वासू, निष्ठावंत आणि निकटवर्तीय म्हणून ओळख असलेल्या विनोद नाना रोडे यांचे कार्य हे केवळ राजकीय चौकटीत मर्यादित नसून सामाजिक, मानवी आणि मूल्याधिष्ठित आहे.



सामान्य माणसातून घडलेले नेतृत्व - विनोद नाना रोडे यांची वाटचाल ही कुठल्याही घराणेशाहीची किंवा अचानक मिळालेल्या संधीची देण नाही. सामान्य कुटुंबातून, सामान्य परिस्थितीतून घडलेले व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचा प्रवास अधिक अर्थपूर्ण ठरतो. लहानपणापासूनच माणसांशी जोडलेले पण समाजाबद्दल कळवळा आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची वृत्ती त्यांच्या स्वभावात होती. गावातील प्रश्न, नागरिकांच्या अडचणी, युवकांचे भविष्य, शेतकऱ्यांचे हाल - या सगळ्या गोष्टी त्यांनी जवळून अनुभवल्या. त्यामुळे राजकारणात प्रवेश करताना त्यांच्या मनात कोणताही दिखावा नव्हता, तर आपल्या माणसांसाठी काहीतरी करायचे हीच प्रामाणिक भावना होती. निष्ठा : शब्दात नाही, कृतीत दिसणारी - राजकारणात निष्ठा ही संकल्पना अनेकदा घोषणांपुरती मर्यादित राहते. मात्र विनोद नाना रोडे यांच्यासाठी निष्ठा हा केवळ शब्द नसून जगण्याचा आणि वागण्याचा मार्ग आहे. आमदार सुरेश धस यांच्याशी असलेले त्यांचे नाते हे वर्षानुवर्षे कसोटीला लागलेले आहे. सुखाचे दिवस असोत किंवा संघर्षाचे काळ, त्यांनी कधीही पाठ फिरवली नाही. संधीसाधू राजकारणाचा मार्ग न स्वीकारता, त्यांनी नेहमीच विश्वास, निष्ठा आणि प्रामाणिकपणा यांनाच प्राधान्य दिले. त्यामुळेच ते आज आमदार सुरेश धस यांचे 'खास' शिलेदार म्हणून ओळखले जातात.

निर्भीड व्यक्तिमत्त्व - स्पष्ट बोलणारा, ठाम उभा राहणारा नेता

विनोद नाना रोडे यांची ओळख म्हणजे निर्भीडपणा आणि स्पष्टवक्तेपणा. ते कुणाचाही मुलाहिजा न ठेवता सत्य बोलतात. मनात जे आहे ते थेट मांडण्याची त्यांची सवय कधी कधी कठोर वाटू शकते, पण त्यामागे असलेली प्रामाणिक भूमिका सर्वांना ज्ञात आहे. चुकीला चुकी आणि योग्याला योग्य म्हणण्याची हिंमत त्यांच्याकडे आहे. दबाव, भीती किंवा राजकीय गणिते यांपुढे न झुकता ते नेहमीच न्यायाची बाजू घेतात. याच कारणामुळे अनेक तरुण त्यांच्याकडे आदर्श नेतृत्व म्हणून पाहतात. प्रशासनाशी समन्वय आणि कामाची शिस्त - विनोद नाना रोडे यांचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची प्रशासकीय जाण आणि कामातील शिस्त. शासकीय यंत्रणा कशी कार्य करते, कुठे अडथळे येतात आणि ते कसे दूर करता येतात, याची त्यांना अचूक माहिती आहे. ते केवळ शिफारसी करून थांबत नाहीत, तर काम पूर्ण होईपर्यंत सातत्याने पाठपुरावा करतात. रस्ते, पाणीपुरवठा, वीज, शैक्षणिक सुविधा, आरोग्य, सामाजिक प्रश्न अशा अनेक विषयांमध्ये त्यांनी प्रभावी भूमिका बजावली आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांचा प्रशासनावरचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. राजकारणातही माणुसकी जपणारा स्वभाव - राजकारणात कटुता, आरोप - प्रत्यारोप आणि द्वेषाचे वातावरण सहज तयार होते. मात्र विनोद नाना रोडे यांनी नेहमीच माणुसकी, संयम आणि सुसंवाद यांना प्राधान्य दिले. विरोधक असले तरी वैयक्तिक आकस न ठेवता, मतभेद केवळ विचारांपुरते ठेवण्याची त्यांची भूमिका समाजात सकारात्मक वातावरण निर्माण करणारी आहे.

प्रत्येकाशी आदराने बोलणे, लहान - मोठ्यांमध्ये भेद न करणे आणि मदतीसाठी आलेल्या प्रत्येकाला ऐकून घेणे, हा त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळेच विविध समाजघटकांमध्ये त्यांच्याबद्दल आपुलकी निर्माण झाली आहे. सामाजिक बांधिलकी आणि युवकांशी नाते - विनोद नाना रोडे हे केवळ राजकीय कार्यकर्ते नसून समाजभान असलेले कार्यकर्ते आहेत. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. गरजू कुटुंबांना मदत करणे, युवकांना योग्य दिशा देणे, शिक्षण आणि संस्कारांचे महत्त्व पटवून देणे, हे त्यांच्या कार्याचे महत्त्वाचे पैलू आहेत.

विशेषतः युवकांशी असलेले त्यांचे नाते उल्लेखनीय आहे. आजच्या तरुणाईला चुकीच्या मार्गापासून दूर ठेवून, परिश्रम, संयम आणि निष्ठेचा मार्ग दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न सातत्याने सुरू असतो.

भविष्याकडे पाहणारे नेतृत्व

आज विनोद नाना रोडे हे नाव केवळ वर्तमानापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते भविष्यातील सक्षम आणि मूल्याधिष्ठित नेतृत्वाची आशा म्हणून पाहिले जाते. त्यांनी आजपर्यंत ज्या पद्धतीने आपले कार्य घडवले आहे, त्यावरून त्यांचा पुढील प्रवास अधिक व्यापक आणि प्रभावी ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त शिराळ गावासह संपूर्ण आष्टी मतदारसंघातून शुभेच्छांचा अक्षरशः वर्षाव होत आहे. कार्यकर्ते, नागरिक, युवक, ज्येष्ठ, मित्रपरिवार आणि हितचिंतक सर्वच त्यांच्या कार्याचा गौरव करत आहेत. निष्ठा, प्रामाणिकपणा आणि माणुसकीचा हा प्रवास अखंड सुरू राहो, हीच सर्वांची सामूहिक भावना आहे. निष्ठेचे जिवंत प्रतीक असलेल्या विनोद नाना रोडे यांना वाढदिवसाच्या दै. समर्थ राजयोग परिवाराकडून मनःपूर्वक आणि हार्दिक शुभेच्छा...!!!

**- राजेंद्र लाड (आष्टी)**
९४२३१७०८८५

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०३१/२०२५**
सुरेखा विरुध्द निरंक
**(मार्फत-ॲड.सुतार ए.एस.गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **कांताबाई गौतम सुरवसे हे दि.२०.१०.२०२५ रोजी संघमित्र नगर, गेवराई ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.सुरेखा भ्र.संतोष सुरवसे वय -४३ वर्षे, धंदा-मजुरी, रा.संघमित्र नगर, गेवराई ता.गेवराई जि.बीड , २.सिध्दार्थ पि.संतोष सुरवसे वय-२५ वर्षे, धंदा-मजुरी रा.सदर, ३.निर्जला पि.संतोष सुरवसे, वय-२४ वर्षे, धंदा-घरकाम, रा.सदर, ४. सुज पि.संतोष सुरवसे, वय-२१ वर्षे, धंदा-मजुरी, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **कांताबाई गौतम सुरवसे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.२९/१२/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०४/०२/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

पान १ वरुन...

**प्रभाग २ मधील ...**

युवा नेते यशराज पंडित, शिवराज पवार, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर, अमोल करांडे, दादासाहेब गिरी, ड. भगवान घुंबर्डे, मधुकर तौर, सुभाष सुतार, गणेश क्षीरसागर, बबलू खराडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

बाळराजे पवार पुढे म्हणाले की, गत निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ मधील आमला एक उमेदवार अवघ्या दोन मतांनी पराभूत झाला होता. मात्र त्या पराभवाचा राग मनात न ठेवता या प्रभागाचा विकास कुठेही थांबू नये, यासाठी त्या उमेदवाराला स्वीकृत सदस्य म्हणून संधी देण्यात आली होती. विकास हा व्यक्तीवर नव्हे तर प्रभागाच्या हितावर आधारित असावा, हीच आमची भूमिका आहे.

मात्र यावेळी प्रभागातील जनतेने मागील पराभवाचा वचपा काढत दोन्ही नगरसेवकांसह नगराध्यक्ष पदासाठीही मोठी मताधिक्याची आघाडी दिली आहे. हा विश्वास आमच्यासाठी प्रेरणादायी असून प्रभाग २ च्या विकासासाठी आम्ही सदैव कटिबद्ध राहू, असे त्यांनी ठामपणे सांगितले. गेवराई नगरपरिषदेच्या माध्यमातून शहराचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्याचा आमचा निर्धार आहे. केवळ आश्वासनांची खैरात न करता प्रत्यक्षात लोकाभिमुख कामे करून दाखवण्यावर आमचा भर राहील. विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता आणि लोकसहभाग जपला जाईल. गेवराई शहरासह प्रभाग क्रमांक २ मधील जनतेचे ऋण कधीही विसरणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

हा नागरी सत्कार सोहळा यशस्वी करण्यासाठी कमलाकर पाठक, ड. सोपान मडके, शेळके काका, सुरज अर्दड, गणेश वारे, अर्जुन तपासे, राहुल वणवे, बाळासाहेब राठोड, अशोक मोताळे, प्रसन्ना जोशी, मुहेश कुलकर्णी, बाळू पोपळघट, पुरुषोत्तम जोशी, प्रदीप वाघमारे, गवारे काका, संतोष तपासे, अतुल उबाळे, हरीश कांडेकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कमलाकर पाठक यांनी केले, सूत्रसंचालन पत्रकार भागवत जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन ड. सोपान मडके यांनी केले.

गेवराईला एक आदर्श शहर बनवून देशाच्या नकाशावर नेऊ - सौ.गीताभाभी पवार

नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताभाभी पवार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, येणाऱ्या काळात गेवराई शहराच्या विकासासाठी महिलांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. महिलांनी पुढे येऊन शहर विकासात योगदान द्यावे. तुम्ही सर्वजण माझ्या सोबत ठामपणे उभे रहा, मी तुमच्यासाठी सदैव तत्पर राहीन. लोकसहभागाच्या बळावर आपण गेवराई शहराला एक आदर्श शहर बनवून राज्यासह देशाच्या नकाशावर नेऊ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**बापू शिंदे सर यांना ....**

विजयसिंह पंडित, मा. श्री. विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी बीड, मा. श्री जितीन रहमान प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी प्राथ. मा. डॉ. श्रीम. किरण कुंवर, शिक्षणाधिकारी मा. श्रीम. प्रियाराणी पाटील यांच्या उपस्थितीत आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

बापू बाबा शिंदे सर हे आष्टा शाळेत सहशिक्षक या पदावर कार्यरत असून त्यांची प्रथम नेमणूक दि. ४ ऑगस्ट १९९८आहे. त्यांची एकूण सेवा २७ वर्षे पूर्ण झाली असून त्यांनी यापूर्वी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हातोला, केंद्र पाटसरा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पोकळेवस्ती

पान १ वरुन...

लोणी सय्यदमीर, केंद्र पिंपळा, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा अंभोरा ता. आष्टी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पुसरा केंद्र कन्या वडवणी ता. वडवणी व सध्या पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आष्टा ह. ना. ता. आष्टी येथे कार्यरत आहेत. त्यांनी त्यांच्या सेवेमध्ये अतिशय तन, मन, धनाने विद्यार्थ्यांना घडविण्याचे, शिकविण्याचे कार्य केलेले आहे. अप्रगत विद्यार्थ्यांना प्रगत करण्यासाठी जादा तासाचे नियोजन करून मुलांना प्रगत केले. सध्या ते बीड जिल्हा भारत स्काऊट गाईड चे जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काऊट या पदावरही कार्यरत आहेत. त्यांनी कोव्हीड १९ या महामारीच्या काळात साकत मधील अनेक नागरिकांना कोव्हीड लस घेण्यासाठी घरोघरी जाऊन प्रयुक्त केले.

तसेच त्यांनी नवी दिल्ली येथे बी. एल. ओ. चे ही प्रशिक्षण घेऊन आष्टी तालुक्यातील सर्व बी. एल. ओंना प्रशिक्षण दिले आहे. भोपाळ येथील एनसीईआरटी येथे योग प्रशिक्षण घेतलेले आहे. त्यांनी मध्यप्रदेश येथील पंचमढी येथे हिमालय वूड बँजचे प्रशिक्षण घेतले आहे. आष्टा शाळेतील ४ स्काऊटला राज्य पुरस्कार मिळवून दिला असून चालू शैक्षणिक वर्षात ६ गाईड व ३ स्काऊट लाही त्यांनी स्काऊट राज्य पुरस्कारासाठी बसवले आहे. त्यांच्या कार्यात त्यांच्या पत्नी व आंधळेवाडी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती द्रौपदी विठ्ठलराव गवळी - शिंदे मॅडम यांचेही मोलाचे योगदान आहे.

त्यांना जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांचे आष्टीचे लोकप्रिय आमदार मराठवाडा भूषण सुरेश (आण्णा) धस साहेब, माजी आ. साहेबराव दरेकर (नाना), तालुक्याचे जेष्ट नेते देविदास (आबा)धस, आष्टा जिल्हा परिषद गटाचे जिल्हा परिषद सदस्य अमरराजे निंबाळकर, आष्टीचे मा. नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे (आण्णा) आष्टीचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे साहेब, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोरंजन धस साहेब, शिक्षण विस्तारअधिकारी श्रीम. सीमाताई काळे मॅडम, प्राथमिक शिक्षक संघाचे तालुका अध्यक्ष संदिप खराडे,स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्थेचे मा. अध्यक्ष सुरेश पवार, विद्यमान अध्यक्ष मारुती पठाडे, सचिव महेश कुमार शिंदे, उपाध्यक्ष अशोक लटपटे, संचालक अप्पासाहेब काळे, दादासाहेब शिंदे, चंद्रशेखर खाडे, प्रविण मेहरकर, रत्नाकर चव्हाण, केंद्रप्रमुख धर्मराज शिंदे, आष्टा शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ मुटकुळे, सहशिक्षक मच्छिंद्रनाथ जगताप, श्रीरंग खोकले, नामदेव भिसे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक सोमनाथ वाळके, उमेश झांबरे, विजय महाद्वार, लक्ष्मण खंदारे, परमेश्वर बोडखे, श्रीम. सुषमा जाधव मॅडम, श्रीम. सुनंदा बांगर मॅडम, ह. भ. प. आदिनाथ दानवे महाराज, मुख्याध्यापक नंदकिशोर होगाडे, आष्टा गावचे सरपंच गणेश माळवे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय पठाडे, उपाध्यक्ष साईनाथ गळगटे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य हनुमंत कन्हेरे, भरत मोहळकर, बनगे ईश्वर, गोरक्षनाथ पठाडे, गौतम रोकडे, उपसरपंच वैभव पठाडे, महादेव आमले, नवनाथ भोरे, अशोक पठाडे, मिलिंद नेटके, मच्छिंद्र साप्ते, संदिप धोंडे, इत्यादी शिक्षक मित्रांनी व ग्रामस्थांनी बापू शिंदे यांना आदर्श पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे आष्टा ग्रामस्थांनी व शिक्षकांनी बापू शिंदे सरांचा शाळेत शाल, फेटा, पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या कार्यक्रमाला आष्टीतून आस्लम शेख, नवनाथ भोरे, राजेंद्र लाड, शहादेव पिंपळे, सुरेश शिंदे, संदिप शिंदे, शशिकांत खाडे, सय्यद सलीम,अंभोरा केंद्राचे केंद्रप्रमुख जावेद पठाण, बिबिषण कवडे, सतिश दळवी, साकतवरुन दादासाहेब शिंदे, विजय शिंदे, अभय शिंदे,

पान १ वरुन...

चंद्रकांत गुंड, त्रिंबक गुंड, दामोधर गुंड, अजिनात परभणे, वैभव परभणे, त्यांच्या आई हौसाबाई शिंदे, बहिण राधाबाई परभणे इत्यादींचा उपस्थिती होती. या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**देगलूर न.प. गटनेतेपदी...**

गटनेतेपदी उज्वला लक्ष्मीकांत पदमवार यांची निवड करण्यात आली. या बैठकीस नगरपरिषदेतील सर्व नगरसेवक उपस्थित होते.

नगराध्यक्ष सौ. विजयमला बालाजी टेकाळे, सौ. पद्दमवार उज्वला लक्ष्मीकांतराव, सौ. कडलवार शोभा दिगंबर, सौ. मैलागिरे रोहिणी बालाजी, सौ.पोटावर योगेश्वरी लक्ष्मण, टेकाळे एकनाथ शेषेराव,बोन्लावार अनिल गंगाराम, सौ. कौरवार रत्नमाला रमेशराव, सौ. कांबळे मीनाक्षी व्यंकट, देशाई ड. अंकुश सुरेशराव, शाकावर नंदकिशोर लक्ष्मण, शेख आशिया फातिमा पाशामीया, कांबळे सुमंत रामचंद्रराव, सौ. द्याडे पल्लवी रुपेश, मोरे कलावतीबाई माधवराव आदि मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




**धाराशिव प्रतिनिधी**

**भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त व भीमा कोरेगाव शौर्य विजयी दिनानिमित्त फुले शाहू आंबेडकर सेवा भावी संस्था धाराशिव संचलित फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समिती व राजगीर बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने धाराशिव शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजयी झालेल्या सर्व उमेदवारांचा म्हणजेच नगराध्यक्ष नगरसेवक व नगरसेविका यांचा सत्कार फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या नियोजित जागेत करण्यात आला.कार्यक्रमापुर्वी तथागत गौतम बुद्ध यांच्या मुर्तीस पुष्प अर्पण करुन बुद्ध वंदना घेण्यात आली,शाल, सन्मान पत्र, भारतीय संविधान उद्देशिका विश्लेषण प्रत, व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेतील संसद मधील भाषण असलेले पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. प्रस्तावनेत अध्यक्ष गणेश वाघमारे यांनी फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने घेण्यात येणारे कार्यक्रम तसेच जागेच्या हस्तांतरण आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय सांस्कृतिक सभागृहाविषयी माहिती दिली.**

## जाहिर प्रगटन

पुणे जिल्हयातील तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, आमचे आशिल नामे, सौ. सिमा रजनीकांत कसबे, रा. ऐ- १६ सी, फ्लॅट नं. ११०८, रिव्हर रेसिडेंसी, चिखली, मोशी रोड, चिखली, पुणे - ४११०६२ ह.मु. पिंपरी चिंचवड, म्हाडा बिल्डींग, पुणे. ता. जि. पुणे यांनी दिलेल्या माहिती, सुचना व अधिकारावरुन व दाखवलेल्या कागदपत्रावरुन या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, चिखली ता.हवेली जि. पुणे येथील गट नं. ९० मधील बांधलेल्या रिवर रेसिडेन्सी, ए- १६ सहकारी गृह रचना संस्था मर्यादित यामधील बिल्डिंग नंबर ए - १६ सी मधील अकराव्या मजल्यावरील फ्लॅट नंबर ११०८ ज्याची साईज ५१४.२९ चौ. फुट असुन सदर मिळकत पिंपरी चिंचवड महा नगर पालीका हद्दीतील मिळकत नं. ११३०१०२१६५ हा फ्लॅट आहे.

सदरची मिळकत आमचे अशिलाची व तिचे पतीची स्वकष्टार्जित मिळकत असुन सदर मिहकतीमध्ये आमचे आशिलाचा व तिच्या मुलांचा कायदेशीर अविभक्त हिस्सा आहे, परंतु आमचे अशिलाचे व तिचे पती मध्ये कौटुंबिक वाद चालु असुन सदरचा वाद न्याय प्रविष्ट असुन आमचे अशिलाचे पती नामे रजनीकांत अशोक कसबे यास दारु पिण्याचे, जुगार खेळण्याचे वाईट व्यसन असल्याने तो त्याचे व्यसनांची पुर्तता करणेकामी तसेच आमचे आशिलाचा व तिचे अज्ञान मुलांचा अविभक्त हिस्सा आमचे अशिलास मिळु नये या हेतुने वर नमुद मिळकत त्यांचे नांवे नोंद असल्याचा गैरफायदा घेऊन सदर मिळकत त्रयस्थ व्यक्तींना विक्री करण्याचा प्रयत्नात आहे. वास्तविक पाहता सदरच्या मिळकतीमध्ये आमचे अशिलाचा व तिचे अज्ञान मुलांचा अविभक्त कायदेशीर हिस्सा असल्याने सदर मिळकतीमध्ये आमचे आशिलाचा व तिचे अज्ञान मुलांचे कायदेशीर हितसंबंध गुंतलेले आहेत.

करिता प्रस्तुतच्या जाहिर प्रगटनाद्वारे पुणे जिल्ह्यातील तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, वर नमुद मिळकतीशी कोणीही त्रयस्थ व्यक्तीने अथवा रंजनीकात अशोक कसबे यांचे सोबत व त्यांचे कुटुंबातील कोणत्याही व्यक्ती सोबत ईसारपावती, करारनामा, मुख्त्यारपत्र, भाडेपत्र, गहाणपत्र, दानपत्र, तारणपत्र, बक्षीसपत्र अथवा ईतर कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये केल्यास सदरचा व्यवहार आमचे आशिलावर कायदेशीरपणे बंधनकारक राहणार नाही. सदरचा व्यवहार केल्यास होणाऱ्या सर्व परिणामाची व खर्चाची सर्वस्वी जबाबदारी सदर व्यक्तीवर असेल याची नोंद घ्यावी.

करिता हे जाहीर प्रगटण.
स्थळ- पुणे
दिनांक- ०१/०१/२०२६

**मार्फत**
**ॲड. सारिका बा. कुलकणी (जोशी)**
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड.
मो. क्र. ८१४९१८६८१८

**जाहिर प्रगटन देणार**
**सीमा रजनीकांत कसबे व अज्ञात मुलगा**

## टी.सी.हरवला आहे

रिना शिवशंकर मुधळकर या नावाचा पाचवी पासचा टी.सी. बीड-गेवराई प्रवासात हरवला आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.
:: संपर्क ::
**शिवाजी नगर गेवराई.**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-४५६ दि.१२.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **सेवक बबन जगधने, रा.बठाण बु.ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलबधता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आराधना सेवक जगधने | मुलगी | २५.१२.२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- १२/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा मतदार संघाच्या विविध प्रश्ना संदर्भात

# पालकमंत्री ना.अजितदादांकडे माजी आ.भीमराव धोंडे यांची आग्रही मागणी

### विहीर,रस्ते,शेततलावासह पूल बंधारे आणि इतर विकासात्मक बाबींकडे लक्ष वेधले

आष्टी - (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांची आज बीड येथे आवर्जून विशेष भेट घेत आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांच्या अनुषंगाने चर्चा केली आणि हे प्रश्न आग्रहाने सोडविण्यासाठी विनंती करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांची बीड येथे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी भेट घेऊन आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदार संघातील अतिवृष्टीने नदीवरचे वाहून गेलेले पूल, बंधारे व शेतकऱ्यांच्या वाहून गेलेल्या जमिनीचे शासकीय नियमाप्रमाणे मिळणारे अर्थसहाय्य तातडीने देण्यात यावे असा आग्रह धरला. एमआरईजीएस अंतर्गत होणारे विहीर, रस्ते, शेततलाव आदि बंद असलेले कामे तात्काळ सुरू करावेत, असे जिल्हाधिकारी यांना आदेश देण्यात यावेत अशीही मागणीह लेखी निवेदनाद्वारे केली आहे. एकूणच आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदार संघातील सर्वसामान्य जनतेच्या अत्यंत महत्त्वाच्या समस्या आणि प्रश्नांवर विशेष भर देत हे प्रश्न मार्गी लागावेत या अनुषंगाने अजित दादाकडे माजी आ. भीमराव धोंडे यांनी विस्तृत चर्चा केली. तेव्हा उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी यासंदर्भात स्वतः लक्ष घालून ते सोडवण्यासाठी कार्यवाही करू असा सकारात्मक प्रतिसाद दिला.



विविध प्रश्न मार्गी लागणार

आष्टी, पाटोदा, शिरूर, विधानसभा मतदार संघातील अतिवृष्टीने नदीवरचे वाहून गेलेले पूल बंधारे शेतकऱ्यांच्या वाहून गेलेल्या जमिनी यांना शासकीय नियमानुसार मिळणारे अर्थसहाय्य तसेच एम आर ई जी एस अंतर्गत विहीर रस्त्याचे तलाव यासंदर्भात माजी आ. भीमराव धोंडे यांनी केलेल्या चर्चेनुसार उपमुख्यमंत्री यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने उत्सुकता निर्माण झाली आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, पांडुरंग नागरगोजे, उत्तम बोडखे, भागवत वारे, अनिल जायभाये आदी उपस्थित होते.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१६१४ दि.२३.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **राजु प्रभाकर बोडखे, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **नात**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलबधता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | वत्सलाबाई प्रभाकर बोडखे | आई | ११.०७.२००१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- २३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१६१५ दि.२३.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **राजु प्रभाकर बोडखे, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **नात**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलबधता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रभाकर सदाशिव बोडखे | वडील | ०५.०९.१९७२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- २३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-११११९ दि.२३.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अशोक सखाराम जमखडे, रा.शिराढोण, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अशोक सखाराम जमधडे | स्वतः | २६.१२.१९९० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- २३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१४४१ दि.२३.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अंजना अंकुश खोमणे, रा.पिठोरी सिरसगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अंजना अंकुश खोमणे | मुलगी | ०१.११.१९९७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- २३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१४६३ दि.१६.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **आसेफखाँ याशिनखाँ पठाण, रा.धाकलगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आसेफखाँ याशिनखाँ पठाण | स्वतः | २३.०४.१९८३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- १६/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५७२ दि.३०.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अशोक भिवसन वैद्य, रा.लोणगांव भायगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | दिनेश अशोक वैद्य | मुलगा | ०७.०२.२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- ३०/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५७१ दि.३०.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मचन कचरू किडवे, रा.लोणार भायगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | लखन मदन किडवे | मुलगा | ०३.०३.२००० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- ३०/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-४८४ दि.०७.१०.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मुकद्दर यासीनखाँ पठाण रा.नागझरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मुनिफा मुकद्दर पठाण | मुलगी | २३.०३.१९९२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- ०७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५४१ दि.३१.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **लाला दस्तगीर सय्यद, रा.धरनगर पिंपळगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | लाला दस्तगीर सय्यद | स्वतः | ०८.१०.१९८३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- ३१/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१२४१ दि.३०.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख मियाँ बाबामियाँ रा.चिंचखेड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख अमीर शेख मियाँ | मुलगा | ०३.०४.१९८६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- ३०/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१२४० दि.३०.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख मियाँ बाबामियाँ रा.चिंचखेड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख समीर शेख मियाँ | मुलगा | १०.०६.१९८३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- ३०/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९१७ दि.३०.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख मजीत शेख उस्मान रा.बोरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख सुहान मजीत | मुलगा | ०१.०८.२०११ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- ३०/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# स्त्री जन्माचे स्वागत करत नववर्षाची सुरुवात पत्रकारांनी करून संवेदनशील संदेश दिला - डॉ. सतीशकुमार सोळंके



## बीड जिल्हा रुग्णालयात १ तारखेला जन्मलेल्या १६ मुलींना नवीन ड्रेस आणि आईला साडी चोळी भेट देत पत्रकार संघाने स्त्री जन्माचे स्वागत केले - वैभव स्वामी





### चला स्त्री जन्माचे स्वागत करू या - वैभव स्वामी

बीड जिल्ह्यात मुलींचा जन्मदर कमी आहे.आगामी काळात हा जन्मदर मुलांपेक्षा सुद्धा जास्त झाला पाहिजे. गर्भामध्ये मुलींना मारणे बंद झाले पाहिजे.यासाठी आता पत्रकार संघ केवळ लेखणीतूनच नाही तर प्रत्यक्ष कृतीतून सुद्धा सामाजिक दायित्व म्हणून ही जबाबदारी स्वीकारत आहे. असे पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख तथा दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी जाहीर केले.

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात कमी होत असलेला मुलींचा जन्मदर लक्षात घेता २०२६ मध्ये मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी पत्रकार संघाच्या वतीने १ जानेवारी रोजी जन्मलेल्या बीड जिल्हा रुग्णालयातील तब्बल १६ मुलींना नवीन ड्रेस आणि त्यांच्या आईंना साडीचोळी भेट देत मिठाई वाटप करून या कन्यांचे स्वागत केले. पत्रकारांनी या संवेदनशील विषयाला प्रत्यक्ष कृती मधून कार्य करत खऱ्या अर्थाने आदर्श संदेश दिला आहे असे मत बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर सतीशकुमार सोळंके यांनी व्यक्त केले.

बीड जिल्हा रुग्णालयामध्ये १ जानेवारी रोजी जवळपास ११ मुलींचा जन्म झाला. या मुलींसह दोन तारखेला सकाळी ११ वाजेपर्यंत जन्मलेल्या ५ मुली अशा एकूण १६ मुलींना नवीन ड्रेस, खेळाचे साहित्य आणि त्या जन्मजात मुलींच्या आईला नवीन साडी चोळी भेट देऊन जिल्हा रुग्णालयातील सर्व प्रस्तुतीगृहात मिठाई वाटप करून स्त्री जन्माचे स्वागत करण्यात आले.

या सामाजिक आणि स्तुत्य उपक्रमाला मुख्य आयोजक पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी,निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मीकांत तांदळे त्याचबरोबर माजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत तसेच पोलीस वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर तसेच समाजसेवक सुशीलकुमार खटोड, पत्रकार संघाच्या महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा,ज्येष्ठ पत्रकार संदीप बेदरे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेश गंगाधरे, जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, राजू वंजारे,सामाजिक कार्यकर्त्या नयना भाकरे यासह प्रस्तुती ग्रहातील वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय कर्मचारी, स्टाफ नर्स यासह मान्यवरांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. यावेळी मुलगी झाली म्हणून काही मातांच्या डोळ्यात जे दुःखाचे अश्रू आले होते ते या उपक्रमामुळे आनंदाश्रूमध्ये परिवर्तित झाले अशा भावना मुलींना जन्म दिलेल्या आईसह उपस्थित नातेवाईकांनी व्यक्त करून या उपक्रमाबद्दल आनंद तर व्यक्त केलाच शिवाय आम्ही मुलगी झाली म्हणून आता पश्चाताप करणार नाहीत तर मुलगी हीच खरी संपत्ती आहे म्हणून तिची चांगली जपवणूक करू आणि तिला समाजामध्ये एक चांगली व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी पालक म्हणून आम्ही देखील जबाबदारी स्वीकारत आहोत अशा भावना व्यक्त केल्या. या सत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या वतीने

# आज प्रशासनातील ६ महिला अधिकाऱ्यांचा सावित्रीच्या लेकी बनल्या प्रशासकीय अधिकारी या पुरस्काराने होणार गौरव



सौ.अनुजा संजय दुसानी (धुळे) (विभाग नियंत्रक, रा.प.बीड विभाग)

श्रीमती पल्लवी शशिकला भाऊसाहेब जाधव, दामिनी पथक प्रमुख (पोलीस उपनिरीक्षक, बीड) अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष बीड

सौ.आशा नारायण धनवडे (अधिक्षिका, शक्ती सदन स्वाधारगृह, बीड)

श्रीमती छाया कचरु सरोदे (काळजीवाहक, जिव्हाळा बेघर निवारा, केंद्र, बीड)

सौ.शिल्पा शिकिशनजी जेथलिया (सहाय्यक लेखाधिकारी, जि.प. बीड)

कु.प्रियंका प्रशांत देशपांडे (मुंबई हायकोर्ट वर्ग-१, स्वीय सहाय्यक)

**रा.प. बीड विभागाच्या विभागीय नियंत्रक . सौ अनुजा दुसानी, दामिनी पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव, सहाय्यक लेखाधिकारी सौ.शिल्पा जेथलिया, मुंबई हायकोर्ट स्वीय सहाय्यक कु. प्रियंका देशपांडे,स्वाधारग्रह बीडच्या अधीक्षिका आशा धनवडे आणि जिव्हाळा केंद्राच्या काळजीवाहक छाया सरोदे पुरस्काराच्या ठरल्या पहिल्या मानकरी..!**

बीड प्रतिनिधी

स्त्री शिक्षणाच्या जननी, थोर समाज सुधारक, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त बीड जिल्ह्यातील ५ प्रशासकीय अधिकारी आणि एक सामाजिक अशा सहा सावित्रीच्या लेकींचा सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ देऊन पत्रकार संघाच्या वतीने सन्मान करण्यात येणार आहे.या कार्यक्रमाला जिव्हाळा बेघर निवारा केंद्र या ठिकाणी पत्रकारांसह पत्रकार प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी केले आहे.

बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र,नवी भाजी मंडई,बीड येथे आज शनिवार दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रशासनातील ५ महिला अधिकारी आणि एक सामाजिक कार्यकर्ती यांना दैनिक समर्थ राजयोग आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा बीडच्या वतीने सावित्रीच्या लेकी बनल्या प्रशासकीय अधिकारी - २०२६ या सन्मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यावर्षी पहिल्या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या आहेत बीड एसटी महामंडळातील विभागीय विभाग नियंत्रक सौ.अनुजा संजय दुसानी, दामिनी पथक प्रमुख तथा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष बीडच्या प्रमुख पोलीस उपनिरीक्षक श्रीमती पल्लवी भाऊसाहेब जाधव, बीड जिल्हा परिषदेमधील सहाय्यक लेखाधिकारी सौ.शिल्पा श्री किशनजी जेथलिया, मुंबई हायकोर्ट येथे वर्ग एकच्या स्वीय सहाय्यक या पदावर नुकतीच निवड झालेल्या बीडच्या पहिल्या मानकरी ठरलेल्या कु. प्रियंका प्रशांत देशपांडे,शक्ती सदन स्वाधारगृह बीडच्या अधीक्षिका सौ आशा नारायण धनवडे आणि जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील महिला काळजीवाहक श्रीमती छाया कचरू सरोदे या सहा महिलांना सावित्रीच्या लेकी बनल्या प्रशासकीय अधिकारी - २०२६ या सन्मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

या गुणगौरव सोहळ्यामागे बीड जिल्ह्यातील मुलींनी, महिलांनी अशा प्रशासनातील आणि समाजकार्यातील महिलांचा आदर्श घेऊन त्यांच्याप्रमाणे आपण देखील घडावे हाच प्रामाणिक आणि प्रांजळ हेतू आहे. त्यामुळे या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यातील मुली आणि महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी केले आहे.

## शिवरायांचा मुस्लिम मावळा समीर शेख यांना गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय आदर्श समाजसेवक पुरस्कार

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील शेतकरी कुटुंबातील सामाजिक कार्यकर्ते शिवरायांचा मुस्लिम मावळा समीर बादशहा शेख यांना आष्टी येथील भगवान महाविद्यालय यांच्या वतीने देण्यात येणारा गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय आदर्श समाजसेवक पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मा. आ. भीमराव धोंडे यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.



समीर शेख यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्य, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा दृढ व्हावा यासाठी सातत्याने केलेल्या कार्याची विविध स्तरांवर दखल घेण्यात आली आहे. सामाजिक क्षेत्रातील त्यांचे योगदान, पत्रकारितेच्या माध्यमातून समाजासमोर मांडलेले ज्वलंत प्रश्न, अपघात ग्रस्त, पूरग्रस्त ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या अडचणी, निराधारांचा आधार, निस्वार्थ लोकांच्या मदतीला धावून जाणे, सुख दुःखात सहभाग, धार्मिक क्षेत्रात सहभाग, शैक्षणिक क्षेत्र तसेच जनतेशी असलेला थेट व दैनंदिन संवाद या कार्याची प्रशंसा करत त्यांना राज्यस्तरीय आदर्श समाजसेवक म्हणून गौरविण्यात आले.

यापूर्वीही समीर शेख यांना दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी लोकशक्ती राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार, दि. ७ सप्टेंबर २०२५ रोजी राज्यस्तरीय युवक आधार शिवरत्न पुरस्कार, २०२४ - २५ या वर्षातील राज्यस्तरीय मौलाना अब्दुल कलाम आझाद समाजसेवा पुरस्कार, तसेच २०२२ - २३ मधील यशवंत रत्न पुरस्कार मिळाले आहेत. याच पुरस्कार मालिकेत दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय आदर्श समाजसेवक पुरस्कार प्रदान करून त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला. हा पुरस्कार केवळ सन्मान नसून समाजातील ऐक्य, सेवाभाव आणि सलोख्याचे प्रतीक असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास सौ. दमयंती धोंडे, युवा नेते अजय (दादा) धोंडे, अभय धोंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य नियमत बेग, राजेंद्र धोंडे, सरपंच संतोष चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव बोडखे, उपनिरीक्षक अन्सार शेख, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे, आष्टी युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, आष्टी पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण पोकळे यांच्यासह संजय खंडागळे, अक्षय विधाते, मारुती सत्रे, संतोष नागरगोजे, राजेंद्र लाड, भीमराव गुरव, संतोष सानप, गणेश दळवी, मनोज पोकळे, जावेद पठाण, हमीद पठाण, अण्णासाहेब साबळे, सरपंच विठ्ठल राख, कल्याण वाल्हेकर सर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील प्रतिनिधी, शिक्षक, विद्यार्थी आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. सर्व स्तरांतून समीर शेख यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# आष्टी,पाटोदा,शिरुरमध्ये शैक्षणिक क्षेत्रातील नवे दालन ;आर्टिफिशियल इंटेलिजन्स महाविद्यालय सुरु करणार - माजी आ. भीमराव धोंडे

गंगाई-बाबाजी कला रौप्य महोत्सवाचा आष्टीत शानदार समारोप संपन्न

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी, पाटोदा, शिरूरसारख्या दुष्काळी भागातील गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी, कामगारांच्या मुलांना शिक्षणाबरोबरच भविष्य काळासाठी उपयुक्त ठरणारे आर्टिफिशियल इंटेलिजन्स (-.ख.) म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता शिकविणारे महाविद्यालय आपण लवकरच सुरू करू..! अशी घोषणा शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आष्टी, पाटोदा, शिरूरचे मा. आ.भीमराव धोंडे यांनी आज येथे केली. तसेच आष्टी, पाटोदा, शिरूरचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी मला त्यांच्या आई - वडिलांच्या नावाने दिला जाणारा गंगाई - बाबाजी जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्यामुळे मला मोठा आनंद झाला. भीमराव धोंडे साहेबांची काम करण्याची पद्धत अतिशय वेगळी आहे. त्यांच्या या उपक्रमाचं मी कौतुक करतो, अभिनंदन करतो. मात्र सध्या समाजात जे काही चालले आहे ते लोकशाही पद्धतीने चालले का हुकूमशाही पद्धतीने चालले ? ते जनतेनेच ठरवावे असे सांगत आपल्या हातून भविष्य काळातील आदर्श पिढ्या घडाव्यात असे प्रतिपादन राज्याचे माजी मंत्री शिवाजीराव पंडित दादा यांनी केले.

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आष्टी, पाटोदा, शिरूरचे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या आई वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ भगवान महाविद्यालयात आयोजित गंगाई बाबाजी रौप्य कला महोत्सवाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री

शिवाजीराव दादा पंडीत, सुभाष सारडा, माजी आ. राजेंद्र जगताप, सुशीलाताई मोराळे, सौ. दमयंती धोंडे, , नायब तहसीलदार भगीरथ धारक, महंत काशिनाथ महाराज, दिनकर तांदळे महाराज, वाल्मीकतात्या निकाळजे, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, अशोक साळवे, विजुशेठ कोठारी, दत्ता काकडे, लालाभाऊ कुमकर, दिपकदादा घुमरे, बबन औटे, पांडुरंग गावडे, सुदाम काका झिंजुर्के, अंकुश मुंडे, डॉ. शैलजा गर्जे, स्वामी सानप, बबन मांगडे, पत्रकार भगवान राऊत, पत्रकार उत्तम बोडखे सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवर सर्व सर्व प्राचार्य,



**सध्या समाजात जे काही चालले आहे ते लोकशाही पद्धतीने चालले का हुकूमशाही पद्धतीने चालले ? ते जनतेनेच ठरवावे - माजी मंत्री शिवाजीराव पंडित**

मुख्याधापक प्राध्यापक, शिक्षक तसेच सर्व विद्यार्थी विद्यार्थीनी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी आ. भीमराव धोंडे पुढे म्हणाले की, बीड जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रात काम करण्याची अजूनही गरज आहे. बीड सारख्या मागासलेल्या जिल्ह्यामध्ये अजूनही निरक्षर लोकांचे प्रमाण काही अंशी शिल्लक आहे. आपण सुरू केलेल्या शाळा, महाविद्यालयाचा उपयोग इथल्या ग्रामीण भागातील लोकांना झाला. आपल्या भागातील ऊस तोडणी कामगारांची संख्या हळूहळू कमी होत आहे. ही समाधानाची बाब आहे. मात्र रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबविणे हे लोकप्रतिनिधी समोर मोठे आव्हान आहे. साहित्यिकांनी शेतकऱ्यांच्या जीवनावर लिखाण केले पाहिजे. शेतकऱ्यांचा उद्धार शिकलेल्या लोकांनी केला पाहिजे. विशेषता पीएच. डी. मिळवलेल्या प्राध्यापकांनी वेगवेगळ्या विषयावर मातृभाषेतून पुस्तके लिहिली पाहिजेत, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. सन २००० साली भगवान महाविद्यालयाच्या एका हॉलमध्ये सुरू केलेला गंगाई - बाबाजी महोत्सव रोप्य महोत्सवी वर्षात येऊन पोहोचला आणि त्याचे एका वेलीचे रूपांतर वटवृक्षात झाले. त्यामुळे आपली सर्वांची जबाबदारी आणखीन वाढली आहे. आपल्या मनोगतातून आईची आठवण काढताच आ. धोंडे गहिवरले.

यावेळी प्रा. सुशीलाताई मोराळे, प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर, सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे, डॉ. विलास सोनवणे, प्राचार्य सतीशचंद्र सूर्यवंशी यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी धार्मिक, शिक्षण, कृषी, वैद्यकीय, क्रीडा, उद्योग, साहित्य, प्रशासन, कला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ.ज्ञानदेव वैद्य, प्रा. बाळासाहेब खेमगर, प्रा. सुरेश फुले, प्रा. श्रीकांत धोंडे यांनी सूत्रसंचालन केल. उपप्राचार्य डॉ. आप्पासाहेब टाळके यांनी आभार मानले.माजी मंत्री शिवाजीराव दादांकडून धोंडे यांच्या कामाच्या पद्धतीचा विशेष उल्लेख आज या मंचावर बीड जिल्ह्यातील ज्येष्ठ माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित यांना गंगाई - बाबाजी जीवनगौरव पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. आपल्या सत्काराला उत्तर देताना दादांनी विविध सद्यस्थितीवरील परिस्थितीवर भाष्य केले. यावेळी गंगाई - बाबाजी जीवनगौरव पुरस्काराने मला आनंद झाल्याची भावना व्यक्त करत माजी आ. भीमराव धोंडे यांची काम करण्याची कार्यपद्धतीच आगळी वेगळी असून मला त्याचा अभिमान आणि विषयक विशेष

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आष्टी येथे या वर्षापासून इंग्रजी,मराठी भाषेतून वारकरी शिक्षण देणारी शाळा सुरु करणार - माजी आ.भीमराव धोंडे

## गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय पुरस्कारांचे थाटात वितरण
## भगवान महाविद्यालयाच्या मंचावर ज्ञानवंत आणि गुणवंतांची मांदियाळी

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने यावर्षीपासून आष्टी येथे ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या मंदिर आवारात इंग्रजी, मराठी भाषेतून वारकरी शिक्षण देणारी शाळा सुरु करणार असल्याची घोषणा शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आष्टी, पाटोदा, शिरूरचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी केली.

आई - वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ भगवान महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित गंगाई - बाबाजी आदर्श शिक्षक, आदर्श सामाजिक कार्यकर्ता व आदर्श पत्रकार पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. सौ. दमयंतीताई धोंडे, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. अजयदादा धोंडे, सौ. अक्षदाताई धोंडे, राजेंद्र धोंडे, माजी सभापती नियामत बेग, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, संतोष भैय्या चव्हाण, प्रफुल्ल सहस्रबुद्धे,भीमराव गुरव, प्रवीण पोकळे, अविनाश कदम, राजेंद्र लाड, शरद तळेकर, प्रा. डॉ. आशाताई चाटे, भागवत खाडे आदी मान्यवर यावेळी विचार पिठावर उपस्थित होते.

प्रारंभी माजी आ. भीमराव धोंडे यांच्या स्व. माता - पित्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना माजी आ. भीमराव धोंडे म्हणाले की, आपल्या महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा लाभली आहे. या परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी आष्टी येथे २ एकर जागेवर भव्य वारकरी शिक्षण संस्था या वर्षीच्या जून महिन्यापासून सुरू करण्यात येणार आहे. आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्यातील ग्रामीण भागातील गोरगरीब, शेतकरी, कष्टकरी, कामगार यांची वारकरी संप्रदायाच्या शिक्षणाची आवड असणाऱ्या मुलांना,







त्याचबरोबर पब्लिक स्कूल मधील विद्यार्थी - विद्यार्थिनींना येथे वारकरी संप्रदायाचे सखोल प्रशिक्षण देण्यात येईल. या शाळेतून घडलेले वारकरी भविष्यात इंग्रजी माध्यमातून कीर्तन, प्रवचन सेवा करतील. आपल्या आई - वडिलांचा सर्वांनी सन्मान केला पाहिजे. आई - वडिलांचे उपकार लक्षात ठेवले पाहिजेत. शिक्षकांनी चांगले शिक्षण देण्याचे काम करावे. कारण जगात गुरूला सर्वश्रेष्ठ मानले जाते. मातृभाषेतून शिक्षण देणे ही आवश्यक आहे. कारण मातृभाषेतील शिक्षणामुळे मुलांवर चांगले संस्कार होतात. पत्रकारांनी समाजातील सत्य निर्भीडपणे आपल्या बातम्यांमधून मांडावे. यशाला कुठल्याही प्रकारचा शॉर्टकट नसतो तर यशाला कष्टाची भूक असते असे ते म्हणाले. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. अजयदादा धोंडे म्हणाले की, गंगाई - बाबाजी महोत्सवाच्या माध्यमातून गेल्या २५ वर्षापासून या कार्यक्रमाचा दर्जा टिकवण्याचा प्रयत्न केला जात आहे. कुठल्याही जातीपातीचा किंवा धर्म, पंथाचा विचार न करता चांगले काम करणाऱ्या व्यक्तींना गंगाई - बाबाजी आदर्श पुरस्कार देऊन दरवर्षी सन्मानित केले जाते. आपण ज्या भागात राहतो त्या भागात आपल्या हातून चांगले काम झाले पाहिजे. यासाठी हा पुरस्कार प्रेरणादायी ठरतो. शिक्षक हा समाजातील अनेक पिढ्या घडवतो. त्यामुळे शिक्षकाला नेहमीच आई - वडिलांपेक्षाही मोठे स्थान आहे असे ते म्हणाले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते माजी सैनिक रणजीत चव्हाण, रविंद्र फुंदे, आयबीएन लोकमतचे प्रतिनिधी पत्रकार सुरेश जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य बाळासाहेब खेमनर, उपप्राचार्य डॉ. ज्ञानदेव वैद्य, प्रा. डॉ. सुरेश फुले यांनी पुरस्कार वितरण समारंभाचे सूत्रसंचालन केले. तर प्राचार्य निशिगंध सर यांनी आभार मानले.

### या कर्तुत्ववानांचा झाला सन्मान

यावेळी पत्रकार सुरेश जाधव, शितल कुमार मोटे, अशोक शिंदे, अजय जोशी, हरिदास शेलार, संतोष सानप, जावेद पठाण, अण्णासाहेब साबळे, गहिनीनाथ पाचबैल, विनोद जिरे यांना गंगाई - बाबाजी आदर्श पत्रकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले तर सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल रणजित चव्हाण, श्रीमती वर्षा शेरकर, रहेमान सय्यद, रावसाहेब पिंपळे, सुखदेव पोकळे, महादेव भवर, गणेश आंबेकर यांना गंगाई - बाबाजी आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. अर्जुन घुगे, प्रा. अजित इथापे, कल्याण वाल्हेकर, संजय सोले, रवींद्र फुंदे, श्यामसुंदर घाडगे, आत्माराम बारवकर, मुकुंद लगड, सुहास साळवे, मल्हारी गर्जे, श्रीमती नीता आघाव, राजू सानप, भानुदास आवळे, सुजाता जाधव, अशोक इथापे, तुकाराम बारामते, श्रीमती मिनाज शेख, पद्मनाथ गर्जे, श्रीमती चंद्रकला लाड, श्रीमती सारिका घाटोळे, सुरेश तळेकर, श्रीमती सायली चौधरी व दिनकर देडे यांना माध्यमिक व उच्च माध्यमिक क्षेत्रातील शैक्षणिक कार्याबद्दल गंगाई - बाबाजी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

### परिसराला ज्ञानवंतांच्या उपस्थितीचा सुगंध

गंगाई - बाबाजी राज्य पुरस्कार राज्यातील विविध भागातील विविध क्षेत्रातील विशेष कर्तुत्व संपादन करणाऱ्या गुणीजणांना आज येथे प्रदान करण्यात आला. या निमित्ताने त्यांच्या समवेत आलेल्या शिक्षण सामाजिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांमुळे आणि उपस्थित युवा आणि युवतींच्या उपस्थितीने भगवान महाविद्यालयाचा परिसर अक्षरशः ओसंडून वाहत होता.

### पुरस्कारार्थींकडून धोंडेंच्या कर्तृत्वाचे कौतुक

पुरस्कारार्थींच्या वतीने प्रतिनिधीक स्वरूपात प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. यातून त्यांनी माजी आमदार भीमराव धोंडे यांचे कर्तृत्व सर्वांगीण, सर्वव्यापी आणि समतोल समाज रचनेसाठी अत्यंत योग्य असल्याचे सांगितले. शाश्वत विकासासोबत समता, बंधुत्व, ऐक्य आणि सर्वधर्म समभावाची भावना जोपासण्याचे मौलिक कार्य आहे असे कौतुकही केले आणि पुरस्कारार्थींच्या वतीने धन्यवाद दिले.




# उच्च शिक्षण घेऊन प्रशासकीय सेवेत माणसातील माणूसपण जपा - अनिल डोंगरे

## स्पर्धा परीक्षेतील बक्षीस वितरण व शालेय साहित्य वाटप... वाचाल तर वाचाल व महामानव अभिवादन ग्रुपचा उपक्रम

बीड /प्रतिनिधी

शिका व मोक्याच्या जागा काबीज करा हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अनमोल उपदेश शिक्षणापासून वंचित असलेल्या बहुजनांनी उच्च शिक्षणाद्वारे प्रशासकीय, न्यायालयीन व संविधानिक उच्चपदे भूषवून देशाच्या नावलौकिकात व प्रगती करता मोलाचा वाटा उचलला आहे. यापुढे देखील समता, बंधुता व न्याय स्थापण्याकरिता उच्च अधिकारामुळे मिळणारे अधिकार वापरताना माणसातील माणूसपण जपा असा संदेश फुले, आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक अनिल डोंगरे यांनी निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण प्रसंगी बोलाचा केला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक वाचनालयाचे अध्यक्ष डी.जी. वानखेडे यांनी तर सूत्रसंचालन डी.एम. राऊत यांनी केले.

महामानव अभिवादन ग्रुप संचलित ४ मोफत शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांकरिता वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयातर्फे नविन वर्षीदिनानिमित्त निबंध व वकृत्व स्पर्धा आयोजित केली होती. बक्षीस वितरण प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त सी.ई.ओ. बनसोडे पी.व्ही. लाभले होते तर प्रमुख पाहुणे म्हणून अनिल डोंगरे, महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले लाभले होते. सेवानिवृत्त शिक्षक आर.डी. चक्रे, सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी ए.एल. औवसरमल, अँड. राजेश शिंदे, प्रमोद कोळेश्वर, के.एस.वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

राजगृह बुद्ध विहारातील शिकवणी वर्गातील प्रथम आलेल्या कु. नंदिनी धन्वे या मुलीने उच्च शिक्षण घेऊन प्रशासकीय सेवेत जिल्हाधिकारी होण्याचा दृढनिश्चय संकल्प केला. व त्याकरिता गरिबी शिक्षणाच्या आड न येऊ देता. अपार कष्ट करून ध्येय प्राप्त करण्याचा पक्का निश्चय केला. तर वक्तृत्व स्पर्धेत प्रथम आलेल्या कु. अनुष्का धन्वेंनी आद्यशिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट उलगडून दाखवला. या दोन्हीही विद्यार्थिनींचा वाचाल तर वाचाल वाचनालया तर्फे राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जीवन चरित्र पुस्तके व शालेय साहित्य देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मासिक चाचणीतील तीनही वर्गातील २४ विद्यार्थ्यांना व राजगृह बुद्ध विहारातील शिकवणी वर्गातील एकूण ४० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाचनालयातर्फे वाटप करण्यात आले. वाचन संस्कृती वाढवण्याकरिता वाचाल तर वाचाल वाचनालयाचे वरवटी येथील ४४ व्या केंद्राचा प्रारंभ नवीन वर्षाच्या दिवशी मान्यवरांच्या हस्ते ४० पुस्तकांचा संच संविधान युवा मंचचे अध्यक्ष अँड. राजेश शिंदे यांना वाचनालयाचे अध्यक्ष डी.जी. वानखेडे यांनी सुपूर्त केला. उच्च शिक्षणाकरिता इंग्रजी भाषेवर प्रभुत्व गरजेचे आहे म्हणून इंग्रजी भाषेचा पाया पक्का व्हावा म्हणून महामानव अभिवादन ग्रुप तर्फे शिकवणी वर्गातील २५ विद्यार्थ्यांना हासुरे इंग्लिश प्रायमर हे पुस्तक वितरित करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी ए.बी.जौजाळ यांनी देखील नवीन वर्षाच्या संकल्प, भीमा कोरेगाव स्वाभिमानाची लढाई याबद्दल माहिती दिली. अध्यक्षीय समारोपात पी.व्ही बनसोडे यांनी उच्च संकल्प प्रत्येकाने केला पाहिजे परंतु तो पूर्ण करण्याकरिता खडतर प्रयत्न व शिक्षणाची व तथागताने सांगितलेल्या पंचशील, अष्टांगिक मार्ग, १० पारमितेची जोड देऊन मानवतावादी विचार ठेवने किती गरजेचे आहे हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अँड.तेजस वडमारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता संघमित्रा वाघमारे, शिक्षक रवींद्र टेकाळे यांनी बहुमोल प्रयत्न केले. सरणातयेने व अल्पोपार वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाला या भागातील विद्यार्थी व पालक वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन ५ जानेवारी रोजी बीडमध्ये होणार

बीड /प्रतिनिधी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार दि. ०५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे.

अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती, दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळवले आहे.

# भीमराव वाघचौरे यांच्या प्रयत्नामुळे तारांगण आणि नाट्यगृहाचा प्रश्न मार्गी

बीड /प्रतिनिधी

बीड शहरातील प्रभाग क्र.१३ मध्ये सायन्स पार्क,तारांगण यासाठी २८ कोटी रु.तर स्व.यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी ८ कोटी रु. निधी राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांनी मंजुर केला आहे.या दोन्ही प्रकल्पासाठी या भागाचे नगरसेवक भीमराव वाघचौरे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांचे स्वप्न साकार झाल्याबद्दल त्यांनी आ.विजयसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत.



प्रभाग क्र.१३ मधून या वर्षी नगर परिषद निवडणूक लढवताना भीमराव वाघचौरे यांनी आपल्या वचननाम्यामध्ये सायन्स पार्क व तारांगणचा उल्लेख केला होता. त्या संदर्भातील घोषणा उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांनी केली. या प्रकल्पासाठी २८ कोटी रु. निधी ही मंजुर केला आहे. ना. अजित दादा पवार ह्यांच्या दूरदर्शी नेतृत्वात बीडकरांसाठी भव्य असे सायन्स पार्क व तारांगण धानोरा रस्त्यावरील पंढरी येथे करण्याचे प्रशासनाने निश्चित केले आहे.सदरील प्रकल्पासाठी २८ कोटींची तरतूद जिल्हा नियोजन मधून करण्यात आली आहे.सायन्स पार्क - ज्यामध्ये चार माहिती केंद्रे, मध्यभागी तारांगण व विज्ञान उद्यान असेल. माहिती केंद्रे ही एआय व आभासी तंत्रज्ञानावर आधारित खेळ,मानव वंशीय इतिहास,प्रकृती शास्त्र व पर्यावरण ह्या मध्ये विभागलेली असतील .तारांगण - विविध ग्रह, तारे, उल्का, धूमकेतू , इंटर गॅलेटिक ऑब्जेक्ट, आकाशगंगा, नेब्युला अशा विविध गोष्टी, अत्याधुनिक यंत्रणा वापरून मातृभाषेत दुर्मिळ अशी माहिती देतील जी विद्यार्थीच नव्हे तर ज्येष्ठांच्या देखील ज्ञानात भर घालील.

नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी ८ कोटी रु. मंजुरीचाही निर्णय अजित दादांनी घेतला.या निर्णयाबद्दल भीमराव वाघचौरे यांनी ना.अजित दादा पवार आणि आ.विजयसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत.



# कंधार नगराध्यक्ष पदभार शहाजी नळगे यांनी स्वीकारला

कंधार (प्रतिनिधी)

कंधार नगर पालिकेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदी बहुमतांनी विजयी झालेले शहाजी नळगे यांनी शुक्रवारी दुपारी माजी नगराध्यक्ष अरविंदराव नळगे, व काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संजय भोसीकर यांच्यासह. महाविकास आघाडीच्या नेत्याच्या प्रमुख उपस्थितीत कंधार न.पा.सभागृहाच्या शानदार सोहळ्यात नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला.

कंधार शहराच्या विकासासाठी आम्ही कोठेही कमी पडणार नाही. सर्व नगरसेवकांनी कंधार शहरातील नागरिकांच्या आशा आकांक्षा समजावून घेत त्यांच्या अपेक्षा पूर्ण कराव्यात, असा सल्ला नूतन नगरसेवकांना अरविंद दादा नळगे व महाविकास आघाडीच्या नेत्यांनी दिला. या कार्यक्रम सोहळ्यामध्ये मुख्याधिकारी कुलदीप भोळे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी नगराध्यक्ष शहाजी नळगे यांच्यासह नूतन नगरसेवकांचा सत्कार सन्मान करून लोकनियुक्त नगराध्यक्ष शहाजी नळगे यांना पदभार हस्तांतरित केला. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी शहाजी नळगे यांना त्यांच्या नगराध्यक्षपदाच्या खुर्चीत बसून आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तर नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शहाजी नळगे यांनी राजकारणातील आपले गुरु तथा वडील अरविंद दादा नळगे यांचा आशीर्वाद घेतला आणि प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात केली. यावेळी माजी नगराध्यक्ष अरविंदराव नळगे,काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संजय भोसीकर,उबाठाचे नेते. डॉ.पुरुषोत्तमराव धोंडगे, वंचित बहुजन आघाडीचे शिवा नरंगले यांच्यासह महाविकास आघाडीचे सर्व नगरसेवक,आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. दरम्यान आजच्या बैठकीत न.प.गटनेते म्हणून भास्कर नळगे व दिलीप देशमुख यांची निवड करण्यात आली. नगराध्यक्षांनी पदभार स्विकारताच नगर पालिका परिसरात महाविकास आघाडीच्या वतीने जोरदार फटाक्यांची आतिषबाजी केली.कंधार सर्व पत्रकार बांधवांच्या वतीने सत्कार केला.शहरातील पालिकेचे प्रशासन पारदर्शी निष्पक्ष आणि लोकांच्या हिताला प्राधान्य देणारे राहील. मूलभूत समस्या सोडविण्यासाठी माझे प्राधान्य असेल,असे लोकनियुक्त नगराध्यक्ष शहाजी नळगे यांनी कबुली दिली.

## हनुमान मंदिरात हनुमान कथेचे आयोजन

धर्माबाद /प्रतिनिधी

येथील श्री हनुमान व महादेव मंदिराचे दिवंगत आर्चक वै गोविंद कृष्णाचार्य संगमकर गुरूजींच्या (मदन महाराज) यांच्या प्रथम स्मृति दिना निमित्त श्री हनुमान मंदिरात दिनांक ६ ते ८ जानेवारी २०२६ या कालावधीत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भागवतकार वे शा सं श्री अनंत महाराज बेलगावकर यांच्या मधुर वाणी तुन श्री हनुमान कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री हनुमान व महादेव मंदिराचे अध्यक्ष डॉ श्री कमलकिशोर काकाणी , आर्चक बालाजी संगमकर आणि सर्व विश्वस्त मंडळाने केले आहे.कथा समय ६ व ७ रोजी दुपारी २ ते ५, ८ रोजी सकाळी १० ते १,महाप्रसाद, ८ रोजी दुपारी १ ते ४ आयोजन करण्यात आले आसुन भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा आसे संयोजका कडुन कळविण्या आले आहे.

# अर्धापूर तालुक्यातील बारसगाव शिवारात बिबट्याचा बैलांवर हल्ला



### शेतकरी वर्ग भयभीत बिबटा जोमात वनविभाग कोमात

अर्धापूर (प्रतिनिधी) तालुक्यातील बारसगाव येथील शेतकऱ्यांच्या बैलावर बिबट्याने हल्ला करून मारण्याचा प्रयत्न दि.१ गुरुवारी रोजी दुपारी केला आहे. शेतकऱ्याच्या सावध भूमिकेमुळे बैलाचे प्राण वाचले आहेत.

बारसगाव शिवारातील शेतकरी सदाशिव मठपती यांचा बैल जनावरे धुर्यावर बांधले होता अचानकपणे बिबट्याने हल्ला करून बैलाच मारण्याचा प्रयत्न केला. बिबट्या बैलावर हल्ला करून खाली पडले होते.

अचानकपणे दोन सालगडी येथे आले त्यांना बिबट्या बैलावर हल्ला करीत असल्याचे लक्षात आले त्यांनी दुसऱ्या दोन सोप्यांना बोलावून चौघजणांनी बिबट्यावर दगडाने प्रतिकार केल्यामुळे बैलासह बाजूला असलेल्या जनावरांच्या जिव वाचला तर बिबट्याने धूम ठोकत पळ काढला आहे.

अचानकपणे बिबट्याचे हल्ले वाढल्यामुळे शेतकरी वर्गानी शेतीतील कामे कसे करावे या चिंतेत असून वन विभागाने बिबट्याला त्वरित जेरबंद करावे अशी मागणी जनतेतून होत आहे. दोन दिवसापूर्वीच बिबट्या निवघा शिवारात आढळला होता. बिबट्याचे व्हिडिओ सुद्धा समाज माध्यमावर व्हायरल झाले होते. वन विभागाने बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पावली उचलावीत तसेच शेतकरी वर्गात बिबट्याच्या वावरामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली की बिबट्या जोमात वन विभाग कोमात अशी चर्चा गावागावात होत आहे. हल्ला केलेल्या बैलावर पशुसंवर्धन विभागाच्या डॉक्टरांनी उपचार केले आहे

## डॉ. शंकररावजी चव्हाण विकास पत्रकारिता पुरस्कार न्युज १८ लोकमतच्या प्रियंका लाठी तर

# कै. सुधाकरराव डोईफोडे प्रेरणादायी पत्रकारिता पुरस्कार निलेश सोमानी यांना जाहीर

नांदेड (प्रतिनिधी) - दरवर्षी पत्रकार दिनानिमित्त देण्यात येणारे डॉ. शंकररावजी चव्हाण विकास पत्रकारिता पुरस्कार मुंबई न्युज १८ लोकमतच्या प्रियंका लाठी तर कै. सुधाकरराव डोईफोडे प्रेरणादायी पत्रकारिता पुरस्कार वाशीमचे निलेश सोमानी यांना जाहीर झाला असून स्व. रामेश्वर बियाणी जीवन गौरव पत्रकारिता पुरस्कार पूर्णा येथील ज्येष्ठ पत्रकार जगदीश जोगदंड यांसह वृत्तपत्र क्षेत्रातील मान्यवरांचा दि. ५ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजता मिनी सह्याद्री सभागृह नांदेड येथे मान्यवरांच्या हस्ते सन्मान होणार असल्याची माहिती मुख्य संयोजक तथा मुख्य संपादक रुपेश पाडमुख यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. मीमांसा फाउंडेशन, दै. समीक्षा,मंथन क्रिएटिव्ह ग्रुप, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, पत्रकार प्रेस परिषदेच्यावतीने दरवर्षी पत्रकार दिनानिमित्त वृत्तपत्र क्षेत्रात कार्यरत मान्यवरांचा त्यांच्या कार्याला प्रोत्साहन मिळावे व त्यांना अधिक प्रेरणा मिळावी म्हणून विविध पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो. यंदाचे हे १८ वर्ष आहे. यात मागील अनेक वर्षापासून विविध चॅनलमध्ये सेवा देणार्या मुंबई न्युज १८ लोकमतच्या निवेदिका प्रियंका लाठी यांना डॉ. शंकररावजी चव्हाण विकास पत्रकारिता पुरस्कार, शैक्षणिक सहभागासह वृत्तपत्र क्षेत्रात योगदान देणारे दैनिक सकाळ पूर्णा येथील प्रतिनिधी जगदीश जोगदंड यांना स्व. रामेश्वर बियाणी जीवन गौरव पत्रकारिता पुरस्कार, दैनिक मातृभूमीचे निवासी संपादक म्हणून कार्यरत असणारे वाशिमचे निलेश सोमाणी यांना कै. सुधाकरराव डोईफोडे प्रेरणादायी पुरस्कार, सातत्याने लिखाण करणारे माहूरचे ज्येष्ठ पत्रकार वसंत कपाटे यांना दैनिक समीक्षा कर्तुत्व सन्मान, सन १९९६ पासून वृत्तपत्रात कार्यरत व विविध पुरस्कार प्राप्त आखाडा बाळापूर येथील दै. लोकमतचे ज्येष्ठ पत्रकार रमेश कदम यांना स्व. अनिल कोकीळ स्मृती पुरस्कार, मागील अनेक वर्षापासून जिल्हा परिषदेच्या सकारात्मक बातम्या देऊन प्रशासनाची शान वाढवण्यासाठी परिश्रम घेणारे मिलिंद व्यवहारे यांना भीमाचा फाउंडेशन ह्यूमन राइट्स वर्कर पुरस्कार, सुट्टी लेखन करत वाढत्या भ्रष्टाचाराविरुद्ध लढा देणारे नायगाव येथील सकाळचे बातमीदार प्रभाकर लखपत्रेवार यांना पंचनामा कार लक्ष्मण गायकवाड निर्भीड पत्रकारिता पुरस्कार, चळवळीसह अनेक लढ्यात भाग घेऊन वचितांना न्याय देण्यासाठी लेखणीतून आवाज उठवणारे परभणी शिल्पकार चे संपादक भूषण मोरे यांना स्वर्गीय माधव अंबुलगेकर युवा पत्रकारिता पुरस्कार, सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती करणारे आपली बिलोली नगरीचे संपादक सय्यद रियाज अब्दुल यांना मंथन क्रिएटिव्ह सोशल मीडिया पुरस्कार, मुखेड तालुक्यातील जांब येथे मागील अनेक वर्षापासून वृत्तपत्र विक्रेता म्हणून सेवा देणारे ज्ञानोबा कानगुले यांना स्व. अनंतराव नागापूरकर वृत्तपत्र विक्रेता पुरस्कार, शहरी भागात वृत्तपत्र विक्रीतून अहोरात्र परिश्रम घेणारे नांदेडचे ज्ञानोबा नरवाडे यांना स्व. प्रमोद योगी वृत्तपत्र विक्रेता पुरस्कार, लेखणीच्या माध्यमातून समाजसेवा करत वृत्तपत्राचा मुख्य कणा असणार्या जाहिरातीतूनही आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे




देगलूरचे पुण्यनगरीचे प्रतिनिधी नरहरी कोलगणे यांना वृत्तपत्र क्षेत्रातील जाहिरात आधारस्तंभ पुरस्कार, छायाचित्रातून बातमी सांगून वेगवेगळ्या माध्यमातून सेवा देणारे किनवट येथील कचरू जोशी यांना वृत्तपत्र क्षेत्रातील तिसरा डोळा फोटोग्राफर पुरस्कार, मागील ४० वर्षांपेक्षाही अधिक काळापासून वेगवेगळ्या वर्तमानपत्रातून संगणक चालक म्हणून काम करत आपल्या कार्यातून ठसा उमटवणारे सत्यप्रभा येथे कार्यरत मधुकर वाघोळे यांना वृत्तपत्र क्षेत्रातील सहकारी दुवा संगणक चालक पुरस्कार, मागील अनेक वर्षापासून मुद्रण संघासह पद्मशाली युवक संघटनेत कार्यरत राहून मुद्रण क्षेत्रात सेवा देणारे नांदेड एकजुटी शहर प्रतिनिधी भारत गट्टेवार यांना स्व. सुरेश पटणे मुद्रण सेवा पुरस्कार, वृत्तपत्र क्षेत्रात तळमळीने लिखाण करून अन्यायाविरोधात आवाज उठवत आपल्या कार्याचा ठसा उमटवणारी मुखेड येथील लोकमतचे प्रतिनिधी शेखर पाटील यांना स्व.गोपाळ देशपांडे कुशल पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

सदरील सोहळ्याला सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मंथन क्रिएटिव्ह ग्रुपचे रामेश्वर धुमाळ, प्रदेश प्रभारी अरविंद जाधव, मराठवाडा अध्यक्ष सखाराम कुलकर्णी, प्रदेश उपाध्यक्ष दत्ताजी मोहिते, सहसंपादक ज्ञानेश्वर पवार, सौ. सविता गबाळे, श्रीमती उषा हाडोळतीकर, सौ अरुणा पुरी, शिवहरी गाढे, आयुब पठाण तथा मुख्य संपादक व संयोजक रुपेश पाडमुख यांनी केले आहे.



तामसा प्रतिनिधी ग्रामीण विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी शाळेत निधी कमी पडू देणार नाही. खरटवाडी ता. हदगांव येथे जिल्हा परिषद शाळेत दोन वर्ग खोलीचं लोकार्पण,व मंगल कार्यालय,दोन अंगणवाडी खोली, पांदन रस्ते, महादेव मंदिर सुशोभीकरण असं एकूण १कोटी ३२लाख रुपये निधी चे भूमिपूजन आमदार बाबुराव कदम कोहलीकर यांच्या हस्ते करण्यात आलं या कार्यक्रमात कोहलीकर यांनी शाळेच्या मूलभूत सुविधा साठी निधी कमी पडुदेणार नाही.शाळेत प्रयोगशाळा, किचन रूम, अतिरिक्त रूम, क्रीडा साहित्य वर्ग वाढी साठी शाळेच्या मुख्याध्यापक चंद्रकांत कुणके यांनी निवेदन दिलं. या कार्यक्रमात तामसा चे माजी सरपंच माधव नारेवाड,नगरसेवक गोपाल सारडा, प्रताप सोळंके, सेवानिवृत्त पोलीस अधीक्षक चांगून बॉईनवाड, राष्ट्रवादी काँग्रेस चे तालुका अध्यक्ष निलू पाटील कल्याणकर, शंकर जगदाळे, हरदास चिंतले, पोलीस पाटील बालाजी कडबे, शिरू पाटील, भगवान पवार, शरद दुगाळे,उमेश पुंजरवाड,गोकुळ पांडे, सरपंच रुक्मिणी पुंजरवाड,शालेय व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष मनोहर पुंजारवाड, भुजंग पुंजरवाड सह गावकरी उपस्थित होते..

## महानगरपालिका निवडणूक प्रभाग क्र १९ व २० मध्ये भाजपा व शिवसेनेच्या उमेदवारांत होणार काटे की टक्कर सर्वच उमेदवार सक्षम

अनिल धमने पाटील
नांदेड जिल्हा प्रतिनिधी

:- नांदेड महानगर पालीका सार्वत्रिक निवडणूक प्रभाग क्र १९ २० या दोन्ही प्रभागात शिवसेना शिंदे गट व भारतीय जनता पार्टी हे महाराष्ट्र राज्यात सत्तेत असलेले मित्र पक्ष आहेत मात्र या दोन्ही पक्षाची नांदेड वाघाळा शहर महानगर पालीका निवडणुकी मध्ये युती झाली नसुन या दोन्ही पक्षाने स्वबळाचा नारा दिला होता मात्र शेवट च्या दिवशी फॉर्म माघार घेण्याच्या अंतिम तारीख दि २ जानेवारी रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजित पवार गटाचे नेते आ प्रताप पाटील चिखलीकर यांनी प्रभाग क्र २० मध्ये युती करूण ४ जागा शिवसेनेला तर एक एस सि महिला संघमित्रा दिलीप कांबळे यांनी सोडून घेऊन यूती केली असून शिंदे शिवसेनेला राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट फक्त प्रभाग क्र २० मध्ये एकत्र लढणार आहेत प्रभाग क्र १९ मध्ये सर्वच पक्ष स्वबळावर लढणार आहेत या दोन्ही प्रभागा मध्ये वाघाळा असदवन सिडको हाडको . कौठा . नविन कौठा . वसरणी. असर्जन .आदी भागात दोन प्रभाग असून या दोन प्रभागा मध्ये प्रभाग क्र २० मध्ये ३१ हजार ९०८ तर प्रभाग क्र १९ मध्ये २९ हजार १७५ मतदार संख्या असून एकूण लोकसंख्या ६१ हजार ८४ आहे तर प्रभाग क्र १९ मध्ये ४ तर प्रभाग क्र २० मध्ये ५ असे एकुण ९ उमेदवार निवडूण द्यायचे आहेत तर यामध्ये भाजपा व शिंदे शिवसेना या पक्षाचे दोन्ही प्रभागातील उमेदवार सक्षम असल्यामुळे या दोन्ही पक्षांतील उमेदवारा मध्ये काटे की टक्कर होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे .

भाजपाचे प्रभाग क्र २० मध्ये सर्वसाधरण पुरुष संजय पाटील घोगरे तर सर्वसाधारण महिला सौ .सुवर्णा सतिष बस्वदे तर ओबीसी पुरुष वैजनाथ देशमुख . ओबीसी महिला मंगला गजानन देशमुख . एस सि महिला सौ निरंजना राजू लांडगे हे निवडणुक रिंगणात आहेत तर प्रभाग क्र १९ मधुन सर्वसाधारण महिला सौ अनुराधा राजु काळे . ओबीसी महिला श्रीमती सुलोचना धोंडीबा काकडे तर एस टी मधून सौ दिपाली संतोष मोरे तर एस सि पुरुष अभिषेक सौदे हे उमेदवार भाजपाच्या वतीने निवडणुक रिंगणात आहेत तर शिवसेना पक्षाच्या वतीने प्रभाग क्र २० मधील सर्वसाधरण पुरुष मध्ये विनय पाटील गीरडे तर सर्वसाधारण महिला सौ रेखाताई विनायक आकुरके . ओबीसी पुरुष संतोष माधवराव कांचनगीरे .ओबीसी महिला सौ योगीता अमोल येरगेवार . राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या एस सि महिला सौ संघमित्रा दिलीप कांबळे .तर प्रभाग क्र १९ मध्ये सर्वसाधारण महिला सौ आरती रामेश्वर काळे . ओबीसी महिला सौ अर्चना आंबादास गोरे . एस टि पुरुष विश्वनाथ जटाळे . एस सि पुरुष भिना गायकवाड यांनी शिवसेना पक्षाच्या वतीने निवडणूक रिंगणात असून या दोन्ही पक्षाच्या १८ उमेदवारा मध्ये तुल्यबल लढत होणार आसल्याचे दिसून येत असून सर्व उमेदवार सर्व बाबीने सक्षम असल्या मुळे येत्या निवडणुकी मध्ये जनता जनार्दन कुणाला पसंदी देऊन कुणाला निवडतील हेच पाहावा लागेल कारण येत्या निवडणुकी मध्ये दोन्ही पक्षाच्या उमेदवारा मध्ये काटे की टक्कर होणार असल्याचे दिसून येत असून भाजपाच्या वतीने माजी मुख्यमंत्री खा अशोकराव चव्हाण . डॉ अजित गोपछडे . महानगर अध्यक्ष माजी आ अमर राजूरकर . संतुकराव हंबर्डे यांच्या सह पक्षाचे ५ आमदार असून पक्षाची ताकद

पणाला लावणार असल्याचे दिसते तर शिवसेना च्या वतीने महाराष्ट्राचे उपनेते विधान परिषदेचे आमदार हेमंत पाटील . यांच्या सह पक्षाचे चार जिल्हाप्रमुख व ३ आमदार व प्रभाग क्र २० मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे नेते प्रताप पाटील चिखलीकर यांची पण मदत मिळणार असून शिवसेना पक्ष पुर्ण ताकदीशी मैदानात उतरले असल्याचे दिसुन येते तर या दोन्ही पक्षाचे नेते मंडळी पण सर्व उमेदवारांच्या पाठीशी भक्कम पणे उभे राहून आप आपल्या पक्षाची ताकत पणाला लावून जास्ती जास्त उमेदवार निवडुण आणणार असल्या च्या तयारीत आसल्याचे दिसत असून सर्वच उमेदवार यांनी जोमात प्रचार कामाला लागल्याचे दिसत आहे .

## किनवट शहरात पिसाळलेल्या कुत्र्याचा धुमाकूळ; ८ ते ९ नागरिकांना चावा - आरोग्य यंत्रणेच्या सज्ञतेवर गंभीर प्रश्न


किनवट /प्रतिनिधी

किनवट शहरात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून सोमवारी (दि. ३०) पिसाळलेल्या कुत्र्याने शहरातील विविध भागात धुमाकूळ घातल्याची गंभीर घटना घडली. या घटनेत सुमारे ८ ते ९ नागरिकांना कुत्र्याने चावा घेतल्याची माहिती समोर आली असून, शहरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेत सौ. सपना संतोष माडपेल्लीवार यांना गंभीर स्वरूपाची जखम झाल्याने त्यांना तात्काळ गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर प्रकृतीची गंभीरता लक्षात घेता पुढील उपचारासाठी त्यांना आदिलाबाद येथे रेफर करण्यात आले आहे.

पिसाळलेल्या कुत्र्यामुळे जीवघेण्या आजाराचा धोकातज्ज्ञांच्या मते, कुत्र्याच्या चाव्यामुळे होणारा रेबीज हा आजार अत्यंत धोकादायक असून वेळेत योग्य उपचार न मिळाल्यास तो प्राणघातक ठरतो. रेबीजची लक्षणे दिसू लागल्यानंतर रुग्णाचा जीव वाचवणे अशक्य होते. त्यामुळे चावा घेतल्यानंतर त्वरित जखम साबण व पाण्याने धुणे, अँटी-रेबीज लस , आवश्यक असल्यास रेबीज इम्युनोग्लोब्युलिन हे उपचार अत्यावश्यक असतात.

किनवट शहरात केवळ कुत्रेच नव्हे तर मोकाट जनावरांचा सुळसुळाट जसे कि, मोकाट गाढवे, डुक्कर, खच्चर यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून हे जनावरं मुख्य रस्त्यांवर बसून वाहतुकीस अडथळा निर्माण करीत आहेत. परिणामी अपघातांचा धोका वाढला असून नागरिकांना जीव मुठीत धरून वावरावे लागत आहे. विशेषतः शाळकरी मुले, वृद्ध नागरिक व महिला यांना याचा मोठा फटका बसत आहे.

आरोग्य व नगरपालिकेच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह या घटनेमुळे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. शहरात अँटी-रेबीज लस पुरेशा प्रमाणात आहे का? , पिसाळलेल्या कुत्र्यांना पकडण्यासाठी स्वतंत्र पथक आहे का?,



नगर परिषदेकडून निर्जंतुकीकरण व नसबंदी मोहीम राबवली जाते का?, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने उपचार देण्याची यंत्रणा सक्षम आहे का?, या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे प्रशासनाकडून अद्याप मिळालेली नाहीत.

मोकाट कुत्र्यांची तात्काळ धरपकड पिसाळलेल्या प्राण्यांना वेगळे ठेवण्याची व्यवस्था अँटी-रेबीज लसींचा मुबलक साठा, पशुवैद्यकीय पथकाची कायमस्वरूपी नियुक्ती, शहरात निर्जंतुकीकरण मोहीम राबविणे, जर वेळीच उपाययोजना केल्या नाहीत तर भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. किनवट शहरात सध्या मोकाट जनावरांचा प्रश्न गंभीर बनला असून पिसाळलेल्या कुत्र्यांमुळे नागरिकांचे आरोग्य व जीवित धोक्यात आले आहे. प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देत तात्काळ आणि ठोस उपाययोजना राबवणे अत्यावश्यक आहे, अन्यथा जनतेचा रोष उफाळून येण्याची शक्यता आहे.



## चिकाळा येथे बिबट्याने पाडला दोन मेंढ्यांचा फडशा

तामसा /प्रतिनिधी

हादगाव तालुक्यातील चिकाळा शिवारात बिबट्याने दोन मेंढ्यांचा फडशा पडून एका मेंढिला गंभीर जखमी केल्याची घटना गुरुवारी (ता. १) पहाटे उघडकीला आली. या घटनेमुळे शेतकरी व ग्रामस्थांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

येथील शकुंतला बाई गायकवाड यांचे घर गाव परिसरातील डोंगराला लागून आहे. गायकवाड कुटुंब मेंढी व शेळ्या पालन करतात. बिबट्याने घरासमोर बांधलेल्या मेंढ्यांवर हल्ला केला. बिबट्याच्या हल्ल्यानंतर गायकवाड कुटुंबाने आरडाओरड केली. या घटनेनंतर तामसा वन परिमंडळ अधिकारी प्रिया साळवे, वनरक्षक वैशाली मुसळे, पोलीस पाटील दत्ता चंदनवार यांनी जायमोक्यावर पाहणी केली. बिबट्याच्या हल्ल्यामुळे शकुंतलाबाई

## लॉर्ड बसवेश्वरा इंग्लिश स्कूलमध्ये पालक व माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न




अर्धापूर (प्रतिनिधी):

येथील लॉर्ड बसवेश्वरा प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये पालक आणि माजी विद्यार्थी मेळाव्याचे नुकतेच दिमाखात आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या प्रदीर्घ शैक्षणिक प्रवासाचा आढावा आणि माजी विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव असा दुहेरी संगम या सोहळ्यात पाहायला मिळाला.

मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म.बसवेश्वर संस्थेचे सचिव पंडितराव लंगडे होते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अजय टेंग्से यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णुकांत कराळे उपस्थित होते.

व्यासपीठावर नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, गटशिक्षणाधिकारी लोकदाजी गोडबोले, पोलीस कर्मचारी इंदू गवळी, प्रा. रघुनाथ शेटे आणि मुख्याध्यापिका सौ.शैलजा शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी महात्मा बसवेश्वर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

मोबाईलच्या अतिवापराबाबत सतर्कतेचा इशारा

प्रमुख मार्गदर्शक विष्णुकांत कराळे यांनी पालकांशी संवाद साधताना मोबाईलच्या दुष्परिणामांवर भाष्य केले. पालक आणि विद्यार्थी दोघांनीही मोबाईलपासून दूर राहून अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. मुलांचे संगोपन करताना त्यांच्या सवयींकडे बारकाईने लक्ष देणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

शाळेच्या प्रगतीचा आढावा

प्रास्ताविक करताना डॉ. रघुनाथ शेटे यांनी शाळेच्या १५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. उद्घाटनपर भाषणात प्राचार्य डॉ. अजय टेंग्से यांनी शाळेच्या शिस्तीचे व उपक्रमांचे कौतुक केले, तर गटशिक्षणाधिकारी लोकदाजी गोडबोले यांनी शाळेच्या शैक्षणिक दर्जाची प्रशंसा केली.

गुणवंतांचा गौरव

यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. आपल्या जुन्या शाळेत पुन्हा आल्यामुळे माजी विद्यार्थी भावूक झाले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापिका शैलजा शेटे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार कांबळे सर यांनी मानले. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.